cmyk

संपादकीय

अभिनेत्याचे अतिरेकी 'दर्शन'

कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र आदी राज्यात चित्रपट अभिनेत्यांना देवता स्वरुप मानणारा वर्ग मोठा आहे. पडद्यावर चांगुलपणा दाखविणारा अभिनेता खऱ्या जीवनातही आदर्शप्राय असतोच असे नाही. गेल्या चार दिवसातील घडामोडी लक्षात घेता पैसा, प्रसिद्धी, लोकप्रियतेच्या जोरावर चित्रपट क्षेत्रातील मंडळी कोणत्या थरापर्यंत पोहोचतात, याचे उदाहरण पहायला मिळते. कर्नाटकातील आघाडीचा अभिनेता चॅलेंजिंग स्टार दर्शनला खून प्रकरणी अटक झाली आहे. गेल्या रविवार दि. ९ जून रोजी चित्रदुर्ग येथील रेणुकास्वामी (वय ३४) नामक युवकाचा खून करून त्याचा मृतदेह नाल्यात फेकून दिल्याचे उघडकीस आले आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–६५ शनिवार दि.१५ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

फुटबॉल युरो वॉरचा आजपासून थरार

नवी दिल्लीः फुटबॉलचा थरार म्हणजे काय? हे पुन्हा एकदा शनिवार पासून फुटबॉल प्रेमींना अनुभवता येणार आहे. फिफा वर्ल्ड कपनंतर सर्वात प्रसिद्ध असलेल्या युरो कप स्पर्धेला सुरूवात होत आहे. ही स्पर्धा १५ जून ते १५ जुलै दरम्यान खेळवली जाणार आहे. ग्रुप स्टेजचे सामने २६ जूनपर्यंत खेळवले जाणार आहेत. तर, बाद फेरीचे सामने २९ जूनपासून सुरू होणार आहेत. स्पर्धेचा किक ऑफ यजमान जर्मनी आणि स्कॉटलॅन्ड यांच्यातील सामन्याने होणार आहे. हा सामना म्युनिक फुटबॉल एरिना येथे होणार आहे. युरो कप २०२४ स्पर्धेमध्ये एकूण २४ संघ सहभागी झाले आहेत. त्यांची प्रत्येकी चार संघांच्या सहा गटांमध्ये विभागणी करण्यात आली असून, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ राऊंड ऑफ १६ फेरीत पोहोचतील. याशिवाय, चार सर्वोत्कृष्ट तिसरे स्थान असलेले संघ १६ च्या फेरीसाठी पात्र ठरतील.

आता वाणिज्य मंत्रालय ठरवणार कांद्याचे दर!

● नाफेड आणि एनसीसीएफचे अधिकार गोठवले

पुणे । प्रतिनिधी

कांदा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत आहे. त्यातीलच एक महत्वाचा निर्णय म्हणजे कांद्याचे दर आता थेट वाणिज्य मंत्रालयाकडून ठरविले जाणार आहेत. यामुळे कांद्याचे दर आणि विविध प्रश्न सूटण्यास मदत होईल असे सांगितले जात आहे.

लोकसभा निवडणुकीत पराभवाचे कारण ठरलेल्या कांदा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकार तर्फे हे एक महत्वाचे पाऊल आहे, असे मत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर यांनी व्यक्त केले आहे. कांद्याला बाजार समितीपेक्षा कमी दर नाफेड आणि एनसीसीएफ देत असल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. याच कांदा प्रश्नामुळे लोकसभा निवडणुकीत देखील महायुतीला फटका बसला होता. केंद्र सरकारकडून नाफेड आणि

◀◀ पान २ वर

शेतकऱ्यांनी नाफेडला कांदा देणे केले बंद

यावर्षी केंद्र सरकारचे पाच लाख टन कांदा खरेदी करण्याचे जाहीर केले होते. हा कांदा नाफेड आणि एनसीसीएफच्या मार्फत खरेदी केला जातो. कांद्याचा दर हा नाफेड आणि एनसीसीएफच्या मार्फत ठरवला जातो. नाफेड आणि एनसीसीएफच्या मार्फत कांदा खरेदी करताना दररोज जो दर जाहीर होत होता तो दर आता आठ दिवसाला जाहीर होणार आहे. हा दर दिल्लीहून ग्राहक संरक्षण मंत्रालय ठरवणार आहे. त्यामुळे बाजार समितीत मिळणाऱ्या दरापेक्षा नाफेड आणि एनसीसीएफचा दर कमी असणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नाफेडला कांदा देणे बंद केल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे प्रमुख भारत दिघोळे यांनी दिली आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांचा कांदा खरेदी करायचा असेल तर नाफेड आणि एनसीसीएफने शेतकऱ्यांना किमान ४००० रूपयांचा दर द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना वीज बील सवलतीचा लाभ मिळणार-पालकमंत्री

बीड । प्रतिनिधी

शासनाने जिल्ह्यात दुष्काळ सदृश्य स्थिती जाहीर केल्याने शेतकऱ्यांना आतापर्यंत ५६ कोटी ८० लाख रुपये वीज बिल सवलत दिली. यातून वंचित राहिलेल्या ३६ हजार शेतकऱ्यांना हा लाभ देण्याचा सकारात्मक निर्णय घेतला आहे. त्याची पूर्तता करण्याचे निर्देश राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी शुक्रवारी दिले.

जिल्ह्यातील वीज वितरण व अनुषंगिक बाबींचा आढावा पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एका बैठकीत घेतला. या बैठकीस माजलगावचे आ. प्रकाश सोळंके, आष्टीचे आ.बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक तसेच वीज वितरण कंपनीचे अधिकारी अभियंता एम. डी घुर्मे, कार्यकारी अभियंता अ.ना.पाटील तसेच इतर अधिकारी यांची उपस्थिती होती. जिल्ह्यात यावर्षी दोन्ही हंगामात पावसाअभावी पिकांची स्थिती खराब राहीली असल्याने शासनाने संपूर्ण बीड जिल्हा दुष्काळ सदृश्य स्थितीचा जिल्हा घोषित केला. यातील तरतुदीनुसार शेतकऱ्यांना ३३ टक्के वीज बिल माफीचा निर्णय शासनाने घेतला होता. जिल्ह्यात असलेल्या एक लाख ८३ हजार २८२ कृषी जोडण्यापैकी १ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना दर तिमाही २८ लाख ४० लाख

◀◀ पान २ वर

नीट विरोधात देशभर आंदोलनाचा भडका!

पेपर लिक करणाऱ्या टोळीने घेतले ३० लाख?

■ १२ आरोपींना अटक, सर्व याचिकांची ८ जुलै रोजी एकत्रित सुनावणी

NEET UG 2024

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या ''नीट'' परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि १५६३ विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क देण्याच्या मुद्यावरून राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) प्रचंड वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. नीट परीक्षेच्या गोंधळावरून विद्यार्थी व पालकांमधील असंतोष दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सर्वोच्च न्यायालयाने ग्रेस मार्क मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचे आदेश देऊनही देशभरात ठिकठिकाणी आंदोलने सुरू आहेत. विद्यार्थी संघटनांनी यावरून रान उठविले आहे. संसदेतही हा मुद्दा गाजणार असल्याने राजकारण तापले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालाबरोबरच ४ जून रोजी नीट परीक्षेचाही निकाल जाहीर झाला होता. या निकालात विद्यार्थ्यांना मोठ्याप्रमाणात ग्रेस मार्क दिल्याचे आढळून आल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोष निर्माण झाला. नीट परीक्षेत पेपरफुटीचा प्रकार घडल्याचाही आरोप झाल्याने आंदोलन भडकले. याप्रकणी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल झाल्या आहेत. दिल्लीतील केंद्रीय शिक्षण मंत्रालय, ओखला येथील एनटीए मुख्यालय, जंतर मंतर अशा ठिकठिकाणी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा भडका उडाला आहे. 'एसएफआय' संघटनेने केंद्रीय शिक्षण मंत्रालयासमोर आंदोलन केले. नीट परीक्षेच्या पारदर्शकतेबद्दल

◀◀ पान २ वर

'एनटीए' विरोधात विद्यार्थी संघटना आक्रमक

नीट परीक्षा २०२४ च्या निकालात ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले. हा आकडा दरवर्षीच्या तुलनेत खुप जास्त आहे. १५६३ विद्यार्थ्यांना एनटीएने अकारण ग्रेस गुण दिले आहेत. काही परीक्षा केंद्रांवर पेपरफुटी झाल्याचा आरोप आहे. बिहारच्या पाटण्यात काही आरोपींना अटक झाली. त्यामुळे देशभरात आंदोलन भडकले आहे. काँग्रेसने या मुद्यावरुन मोदी सरकारला घेरण्यास सुरूवात केली आहे.

» कोट्यवधीचा घोटाळा

बिहारच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासावरून असे दिसून आले आहे की, पेपर लिक करणाऱ्या टोळीने परिक्षार्थ्यांकडून ३० ते ३२ लाख रुपये घेतले. उमेदवारांना सेफहाऊसमध्ये उत्तर देण्यास सांगितले गेले, तेथून त्यांना एस्कॉर्टसह थेट परीक्षा केंद्रांवर पाठवले गेले. पेपर लीकचे हे रॅकेट अनेक कोटींचे असल्याचा पोलिसांना संशय असून, सध्या १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

» नांदेड मध्येही विद्यार्थ्यांचा मोर्चा

परीक्षेतील गैरप्रकाराच्या चौकशीसाठी समिती नेमून दोषींवर कारवाई करावी तसेच नीट परीक्षा पुन्हा घेण्यात यावी आदी मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी शुक्रवारी मोर्चा काढला. या मोर्चात सहभागी झालेल्या हजारो विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करून सर्वांचे लक्ष वेधले. त्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन सादर केले.

आत्महत्या केलेल्या पांडुरंग सोनवणेच्या कुटुंबियांची घेतली भेट

आर्थिक मदतीसह पांडुरंगच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या निकालात भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांचा पराभव झाल्याच्या दुःखात अंबाजोगाई तालुक्यातील डिघोळ आंबा गावच्या पांडुरंग सोनवणे या तरुणांनी आत्महत्या केली होती. शुक्रवार जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सोनवणे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. निवडणुकांमध्ये जय - पराजय होत असतात मात्र या विवंचनेतून कोणी आपला जीव गमवावा, ही आमच्या मनात अपराधीपणाची भावना उत्पन्न करणारी बाब आहे.

◀◀ पान २ वर

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री येडियुराप्पा यांच्या अटकेला स्थगिती

बंगळूरू । वृत्तसंस्था

भाजपचे ज्येष्ठ नेते व कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुराप्पा यांच्यावर पोक्सो गुन्ह्यात गुरुवारी (दि.१३) अजामीन अटक वॉरंट जारी करण्यात आले होते. परंतु शुक्रवारी झालेल्या सुनावणीवेळी पुढील सुनावणीच्या तारखेपर्यंत येडियुराप्पा यांना अटक आणि ताब्यात घेण्याची सक्तीची कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली आहे, असे कर्नाटक न्यायालयाने म्हटले आहे. अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार येडियुराप्पा यांच्याविरुद्ध नोंद असून, या प्रकरणाची सीआयडी चौकशी सुरू आहे.

◀◀ पान २ वर

एसआयटी रद्दवरून जरांगेंचा पुन्हा देवेंद्र फडणवीसांवर संशय

एसआयटी लागली त्यावेळी आनंदाने बाके वाजवणारेच आता मला भेटायला येतात

छ. संभाजीनगरे। प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला होता. त्यांनी एसआयटी चौकशी रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, खरंच तसे होईल का? की त्यांनी केवळ शेंगा हाणल्या, हे लवकरच कळेल, अशा शब्दांत मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी फडणवीसांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला. गुरुवारी उपोषण मागे घेतल्यानंतर शहरातील खासगी

रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. शुक्रवारी (दि.१४) ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

सभागृहात मराठा आंदोलनावर एसआयटी चौकशी स्थापन झाली. त्यावेळी आनंदाने बाके वाजवणारेच आता मला भेटायला येत आहेत. हे मराठा समाजाच्या एकजुटीचे यश असल्याचे म्हणत त्यांनी सत्ताधारी आमदारांना टोला लगावला. तसेच आता पुढील एक महिन्याच्या आत आरक्षण मिळाले नाही. तर संपूर्ण समाज रस्त्यावर

◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड,दि.१३ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ३५.५० क्विंटल	२,१६०	२,३७१	२,२९३
ज्वारी/हायब्रिड: १२८.५० क्विंटल	१,६७६	२,८८१	२,३१६
मूग : ०.५० क्विंटल	७,२३०	७,२३०	७,२३०
तूर : ८.५० क्विंटल	९,७००	११,४५१	१०,९७५
उडीद : ९.५० क्विंटल	२,३३२	२,६००	२,४४४
बाजरीः १७.५० क्विंटल	२,४६१	२,६९०	२,५७६
चिंच/लोकलः ४७.०० क्विंटल	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीनः ११४.०० क्विंटल	४,४११	४,४३१	४,४२३
हरभराः २७.०० क्विंटल	६,४००	६,५५०	६,४७५

आम्ही परत येऊ-प्रकाश आंबेडकर

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत आघाडी न झाल्याने वंचित बहुजन आघाडीला स्वतंत्र निवडणूक लढवावी लागली. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या समर्थकांनी वंचित बहुजन आघाडी पक्ष भाजपाची बी टीम असल्याची टीका केली. यावर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी एक्स ट्विटरच्या माध्यमातून शुक्रवारी संताप व्यक्त करत मी भाजपाची बी टीम आहे का असा सवाल केला.

प्रकाश आंबेडकर आपला संताप व्यक्त

◀◀ पान २ वर

राज्यात चारा डेपो उभारण्यास शासनाची परवानगी-विखे पाटील

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील अनेक भागात पावसाचे आगमन झाले असले, तरी अनेक विभागात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे राज्यातील १२४५ महसुली मंडळात चारा डेपो उभारण्यास शासनाने परवानगी दिल्याची माहिती राज्याचे महसूल तथा पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यापासून राज्यात विविध ठिकाणी पावसाला सुरवात झाली आहे.

◀◀ पान २ वर

भिडेवाड्यातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचा आराखडा तयार

■ शाळा नाही पण मुलीसाठी वेगवेगळे अभ्यासक्रम सुरू होणार

पुणे । प्रतिनिधी

महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडेवाड्यात सुरू केलेल्या मुलींच्या पहिल्या शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्यादृष्टीने आवश्यक ती प्रक्रिया करुन गतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या स्मारकाच्या कामाचे भुमिपुजन जुलैमध्ये होणार आहे. या स्मारकाचा आराखडा तयार केला आहे. या ठिकाणी शाळा होणार नाही. पण तेथे मुलीसाठी वेगवेगळे अभ्यासक्रम सुरू केले जातील, असे उपमुख्यमंत्री अजित पवार

◀◀ पान २ वर

स्मारक विस्तारासाठी २०० कोटी, जुलै अखेरीस भूमिपूजन

जुलै अखेरीस या कामाचे भूमिपूजन करायचे असल्याने स्मारकाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने गतीने कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी छगन भुजबळ यांनी दिल्या. यावेळी अजित पवार म्हणाले की, गंजपेठ येथील महात्मा फुले वाडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्मारकांच्या विस्तारासाठी आगामी अर्थसंकल्पात २०० कोटींची तरतुद करणार आहे. या स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी भूमिसंपादन करण्याकामी लगतचे जागामालक आणि भाडेकरु यांना मोबदला देण्यासाठी रकमेच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे तातडीने सादर करावा, असे निर्देशही यावेळी दिले.

cmyk

अग्रलेख

अभिनेत्याचे अतिरेकी ‘दर्शन’

कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र आदी राज्यात चित्रपट अभिनेत्यांना देवता स्वरुप मानणारा वर्ग मोठा आहे. पडद्यावर चांगुलपणा दाखविणारा अभिनेता खऱ्या जीवनातही आदर्शप्राय असतोच असे नाही. गेल्या चार दिवसातील घडामोडी लक्षात घेता पैसा, प्रसिद्धी, लोकप्रियतेच्या जोरावर चित्रपट क्षेत्रातील मंडळी कोणत्या थरापर्यंत पोहोचतात, याचे उदाहरण पहायला मिळते. कर्नाटकातील आघाडीचा अभिनेता चॅलेंजिंग स्टार दर्शनला खून प्रकरणी अटक झाली आहे. गेल्या रविवार दि. ९ जून रोजी चित्रदुर्ग येथील रेणुकास्वामी (वय ३४) नामक युवकाचा खून करून त्याचा मृतदेह नाल्यात फेकून दिल्याचे उघडकीस आले आहे. बेंगळूर पोलिसांनी अभिनेता दर्शन तुगुदीपसह अकरा जणांना अटक केली आहे. देशभरात सँडलवूडला शरमेने मान खाली घालावी लागणारी ही घटना आहे.

खून झालेला रेणुकास्वामी हा दर्शनचा चाहताच होता. कर्नाटकात डॉ. राजकुमार, विष्णूवर्धन, अंबरीश, शंकरनाग असे एकापेक्षा एक आघाडीचे अभिनेते होऊन गेले. डॉ. राजकुमार हे तर कन्नड चित्रपटसृष्टीतील एक अध्यायच होते. प्रत्येक गोष्टीत त्यांचे वागणे बोलणे आदर्श असेच होते. शेजारच्या तामिळनाडू व आंध्रप्रदेशात तर चित्रपट जगतातील अभिनेते, तेथील राजकारणात नेते बनल्याचे अनेक उदाहरणे आहेत. मुख्यमंत्रीपदापर्यंत ते पोहोचले होते. एमजीआर, एनटीआर, जयललिता, एम. करुणानिधी, हे अभिनय क्षेत्रातूनच राजकारणात आले होते. कर्नाटकातही डॉ. राजकुमार यांनी राजकारणात प्रवेश करावा, यासाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांनी प्रयत्न केले. शेवटपर्यंत राजकीय प्रवेशाला ते तयार झाले नाहीत. त्यांच्या निधनानंतर त्यांची सून गीता शिवराजकुमार यांनी काँग्रेस व निजदमधून गेल्या विधानसभा, लोकसभा निवडणूक लढविल्या होत्या. दोन्ही वेळा त्यांच्या पदरी अपयशच आले. डॉ. राजकुमार हयात असेपर्यंत मात्र त्यांच्या कुटुंबातून कोणीच राजकारणात आले नाहीत. दर्शन तुगुदीप यांच्या अटकेमुळे सँडलवूडला मोठा धक्काच बसला आहे. रेणुकास्वामी या युवकाचा खून दर्शन तुगुदीप व त्याची मैत्रीण पवित्रा गौडा यांना झालेली अटक या घटनेतून सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरातून काय होऊ शकते? याचे प्रत्यंतर आले आहे. दर्शन गेल्या अनेक वर्षांपासून वादग्रस्त व्यक्तिमत्त्व आहे. कर्नाटकात त्याच्या चाहत्यांची संख्याही मोठी आहे. जरा कोणी दर्शनविरुद्ध गळा काढला तर लगेच त्याचे चाहते त्यांच्या घरासमोर ठाण मांडतात. आमच्या बॉसला तुम्ही असे का बोललात? असा जाब विचारतात. चाहत्यांमध्ये ‘डी बॉस’ नावाने ओळखला जाणारा दर्शन आपल्या वैयक्तिक जीवनाची घडी विस्कटल्याने अनेकवेळा चर्चेत आला होता. काही वर्षांपूर्वी दर्शनने आपली पत्नी विजयलक्ष्मी हिला मारहाण केली होती. त्यावेळी तब्बल २८ दिवस त्याला कारावास भोगावा लागला होता. या प्रकरणानंतर सँडलवूडमधील दिग्गजांनी दर्शन व विजयलक्ष्मी या दांपत्यातील कलहाला कारणीभूत असणाऱ्या एका उत्तर भारतीय अभिनेत्रीवर बहिष्कार घातला होता. दर्शनचे कौटुंबिक जीवन काही रूळावर आले नाही. गेल्या दहा वर्षांपासून पवित्रा गौडा या अभिनेत्रीसमवेत त्याची मैत्री होती. या मैत्रीला दहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर पवित्राने दर्शनसोबतचा आपला फोटो सोशल मीडियावर अपलोड केला. ‘आमच्या मैत्रीला दहा वर्षे पूर्ण झाली.’ यानिमित्त हा फोटो शेअर केला होता. फोटोत पवित्रा गौडाची मुलगीही होती.

या फोटोमुळे दर्शनची पत्नी विजयलक्ष्मी भडकली. सोशल मीडियावर दुसऱ्याच्या पतीसोबतचा फोटो शेअर करणे चुकीचे आहे, अशी स्पष्ट भूमिका विजयलक्ष्मीनी मांडली होती. या भूमिकेला दर्शनच्या अनेक चाहत्यांनी पाठिंबा दिला होता. पाठिंबा देणाऱ्यांमध्ये खून झालेला रेणुकास्वामी हाही होता. या वादात विजयलक्ष्मीला पाठिंबा देण्याच्या भरात रेणुकास्वामीने पवित्रा गौडाविषयी आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यामुळेच संतप्त झालेल्या पवित्राने दर्शनला ही गोष्ट सांगितली. औषध दुकानात काम करणाऱ्या रेणुकास्वामीचे ८ जून रोजी अपहरण करून फिल्मी स्टाईलने त्याचा खून करण्यात आला आहे.

खून प्रकरणात दर्शनला अटक झाल्यानंतर त्याचे चाहते रस्त्यावर उतरले आहेत. ‘आमचा बॉस खून करणाऱ्यांपैकी नाही. त्यांना झालेली अटक हा एक षडयंत्राचा भाग आहे’, अशी ओरड त्यांनी सुरू केली आहे. यावरून आपल्या आवडत्या अभिनेत्याने काहीही केले तरी त्याचे चाहते पाठीशी उभे राहतात, हे अधोरेखित झाले आहे. आपण व आपल्या मैत्रिणीसह या प्रकरणातून बाहेर पडण्यासाठी दर्शनने मोठी डीलही केली होती. त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी पवित्रा गौडासह दर्शनला अटक झाली आहे. त्याला वाचविण्यासाठी काही राजकीय नेत्यांची धडपड सुरू झाली आहे. त्यामुळेच हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्याची मागणी खून झालेल्या रेणुकास्वामीच्या कुटुंबीयांनी केली आहे. रेणुकास्वामीची पत्नी पाच महिन्यांची गरोदर आहे. तो स्वत: दर्शनाचा मोठा चाहता होता. पैसा, प्रसिद्धी डोक्यात गेल्याने माजलेल्या दर्शनने मात्र आपल्या चाहत्याला माफ केले नाही.

राज्य सरकारकडून वक्फ मंडळाला १० कोटींचा निधी

उपमुख्यमंत्री ना.अजित पवारांसह महायुती सरकारचे डॉ.योगेश क्षीरसागरांकडून आभार

बीड | प्रतिनिधी

राज्यातील 'वक्फ' मंडळाचं बळकटीकरण करण्यासाठी सरकारनं १० कोटींच्या निधीची तरतूद केलीय. त्यापैकी २ कोटी रुपये १० जूनला वितरीत केल्याचा शासन आदेश अल्पसंख्यांक विकास विभागानं काढला आहे. अल्पसंख्याक समाजाच्या हिताचा निर्णय असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, राज्यातील महायुती सरकारनं वक्फ मंडळासाठी १० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. त्यापैकी संभाजीनगर येथील 'वक्फ' मंडळाला राज्याच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून २ कोटींचा निधीही वितरीत करण्यात आला आहे. या निधीमुळं अल्पसंख्याक समाजाला बळकटी मिळणार असून अल्पसंख्याक समाजातील शिक्षण, आरोग्याच्या प्रश्नासाठी हा निधी वापरला जाणार आहे. त्यामुळे अल्पसंख्याक समाजाची प्रगती होणार आहे. हा हिताचा निर्णय घेतल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजितदादा पवार, कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे आभार मानले आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा पाणी प्रश्नाविषयी चर्चासत्र

बीड | प्रतिनिधी

मराठवाडा पाणी प्रश्नाविषयी जलसंवाद विचार मंथन तथा चर्चासत्राचे आयोजन मराठवाडा जलसमृद्धी प्रतिष्ठान, टीम ऑफ असोसिएशन ,मसिआ, मराठवाड्यातील सर्व सलग्न संस्था ,साखर कारखाने व शेतकरी सहकारी पाणी वापर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा पाणी प्रश्ना बाबत विविध विषयावर चर्चासत्राचे आयोजन रविवारी दिनांक १६ जून २०२४ रोजी सकाळी ९ ते १ वाजे च्या दरम्यान श्रीमती रत्नप्रभा बाळासाहेब पवार सभागृह ,मसीआ ,पी -२५ धुत हॉस्पिटल कडून आत मध्ये उत्तरेस एमआयडीसी, चिकलठाणा, एसबीआय मागे, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केले आहे .जलसंवाद २०२४ चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मराठवाड्यातील तसेच बीड जिल्ह्यातील इच्छुकानी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मराठवाडा जलसमृद्धी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ .शंकरराव नागरे ,मसी आचे अध्यक्ष चेतन राऊत ,टीम ऑफ असोसिएशनचे समन्वयक मुकुंद कुलकर्णी, अनिल पाटील, सर्जेराव वाघ, के. एम .वडगावकर , डॉ. वसंत मुंडे, महादेव पेठे व मराठवाडा जलसमृद्धी प्रतिष्ठानचे बीड जिल्हा समन्वयक डॉ. संजय तांदळे आदींनी केले आहे.

गेवराई तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ ; ग्रामस्थ झाले भयभीत

श्रीपत अंतरवाला परिसरात वासराचा पाडला फडशा

गेवराई | प्रतिनिधी

गुरुवार रोजी गेवराई तालुक्यातील श्रीपत अंतरवाला परिसरात बिबट्या दिसल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.सदरील बिबट्याने आंतरवाला येथील शेतकरी बाळासाहेब आर्दड यांच्या शेतातील गाईच्या वासराचा फडशा पाडल्याने त्याचा मृत्यू झाला आहे.या घटनेने गेवराई तालुक्यात एकच खळबळ उडाली असुन सदरील बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील भयभीत झालेल्या ग्रामस्थांमधून आता होऊ लागली आहे.गुरुवार रोजी या परिसरात बिबट्याने मुक्त संचार केला असुन त्याचे अनेकांनी व्हिडिओ चित्रीकरण केल्याचे समजते.याबाबत गेवराई व बीड वन विभागाने श्रीपत आंतरवाला परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.दरम्यान बिबट्याच्या दहशीतीमुळे आज शुक्रवार रोजी या परिसरातील अनेक ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी शेतात व परिसरात फिरण्यास आवर घातल्याचे दिसून आले आहे.तर कामगार लोक देखील शेतात काम करण्यासाठी जाण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून आले.

पालखी मिरवणुकीने माऊली दादा महाराज यांच्या पुण्यतिथीस उत्सवात सुरुवात..

नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी लक्ष वेधले..!

बीड| प्रतिनिधी

महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र चाकरवाडी मध्ये विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांची २४ वी श्रपुण्यतिथी उत्सवा निमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहास पालखी मिरवणुकीने सुरुवात झाली आहे. भव्य पालखी शोभायात्रा शेकडो बाल वारकरी टाळ मृदंगाच्या जयघोषात श्री क्षेत्र चाकरवाडी नगरी दुमदुमली. सकाळी माऊली धाम या ठिकाणाहून माऊली दादांच्या पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. संत महंतांच्या हस्ते टाळ वीणा मृदंग पालखी आणि ग्रंथ पूजन करण्यात आले. बंकटस्वामी मठाचे मठाधिपती ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या हस्ते टाळ वीणा मृदंग आणि पालखी पूजन करून भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात झाली. यावेळी उपस्थित ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे, चाकरवाडी गावचे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, चाकरवाडी गावचे आदर्श सरपंच विनोदजी कवडे, गंगाधर पुरी तसेच महाराष्ट्रातील माऊली भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी येथे वै. सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २४ व्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात शुक्रवारी सकाळी मोठ्या थाटामाटात सुरुवात झाली यावर्षी नव्याने अभिनव उपक्रम घेत शोभायात्रेत भव्य पालखी मिरवणुक सकाळी ८ वाजता माऊलीधाम पासून ते माऊली समाधी स्थळापर्यंत पालखी मिरवणूक करण्यात आली यावेळी नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली. आठ दिवस होणाऱ्या या भव्य पुण्यतिथी उत्सवात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध श्रीराम कथा प्रवक्ते समाधान महाराज शर्मा यांची कथा संपन्न होत आहे कीर्तन भजन हरिपाठ या अध्यात्माच्या ज्ञानाबरोबरच जनप्रबोधनाची मोठी रेल चेल असणार अहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक वादक तसेच सर्व वारकरी मंडळींची उपस्थिती राहणार आहे. सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी माऊली भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बाळनाथ माऊली संस्थानचे मठाधिपती ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या, ह भ प गुरुवर्य नारायण महाराज गिरी भाऊ यांनी केले आहे.

पान १वरून...

आता वाणिज्य मंत्रालय

एनसीसीएफच्या माध्यमातून कांदा खरेदी होते. याआधी कांद्याचे दर एनसीसीएफ आणि नाफेडकडून ठरवले जात होते. जोपर्यंत नाफेड बाजार समितीत कांदा खरेदी करणार नाही, तोपर्यंत व्यापारी आणि नाफेडमध्ये स्पर्धा होणार नाही. तोपर्यंत शेतकर्यांना भाव मिळणार नसल्याची ओरड शेतकरी वर्गातून होत आहे. देशात दरवर्षी कांद्याच्या दराचा मुद्दा गाजतो. सातत्याने दरात चढ उतार होत असल्यामुळे शेतकऱ्यांना फटका बसत आहे, कधी अस्मानी संकट असतं तर कधी सुलतानी संकट येते. कांद्याच्या दरात वाढ झाली की सरकार निर्यातबंदी करते. परिणामी कांद्याचे दर घसरतात. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसतो. यावर्षी देखील अशीच स्थिती राहिल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळाले.

नीट विरोधात देशभर

विद्यार्थ्यांनी शिक्षणमंत्र्यांना जाब विचारला. ‘‘अभाविप’’ने एनटीएच्या मुख्यालयाबाहेर आंदोलन केले. नीट पेपरफुटीची सीबीआय़ चौकशी करण्याची मागणी अभाविपच्या राष्ट्रीय सचिव शिवांगी खरवाल यांनी केली आहे. ‘‘एनएसयूआय’ ने १३ जून रोजी जंतर मंतरवर मोठे आंदोलन करुन संपूर्ण परीक्षा रद्द करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर, नगर, पुणे, नांदेड आदी शहरांमध्येही विद्यार्थांनी आंदोलन केले. उत्तरप्रदेशच्या कानपूर, लखनौ, वाराणसीसह इतर ठिकाणीही आंदोलनाचा भडका उडाला आहे. नीट परीक्षा रद्द करुन फेरपरीक्षा घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणशी मतदारसंघात बनारस हिंदू विद्यापीठाच्या गेटसमोर विद्यार्थ्यांनी ११ जून रोजी आंदोलन करुन नीट पेपरफुटीच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली. झारखंडमधील रांची, बिहारच्या पाटणासह पश्चिम बंगालच्या कोलकातामध्येही विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या आहेत. अखिल भारतीय लोकशाही विद्यार्थी संघटनेने (एआयडीएसओ) कोलकत्ता येथील उच्च शिक्षण मुख्यालयाजवळ १३ जून रोजी आंदोलन केले आहे. हरियाणाच्या सोनीपत, राजस्थानच्या जयपूर, अजमेरमध्येही विद्यार्थी,पालक रस्त्यावर उतरले आहेत. गोध्रा येथील परिक्षा केंद्र मिळविण्यासाठी १० लाख रूपयांपर्यंतची लाच देण्यात आली. पेपर लिक करणाऱ्या टोळीने सुमारे ३० ते ३२ लाख रूपये घेतले असून,१२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या साऱ्या गैरप्रकाराची सीबीआयमार्फत चौकशी करण्यासंदर्भातील याचिका दाखल झाल्याने त्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने एनटीए तसेच याचिकाकर्त्यांना नोटीस बजावली आहे. सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी ८ जुलै रोजी घेतली जाणार आहे. दरम्यान, नीट परिक्षेतील कथित गैरव्यवहाराच्या अनुषंगाने देशभरातील न्यायालयांमध्ये ज्या याचिका दाखल झाल्या आहेत, त्या सर्वोच्च न्यायालयात वर्ग केल्या जाव्यात, अशी विनंती नीट परिक्षेचे आयोजन करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) केली आहे.

शेतकऱ्यांना वीज बील सवलतीचा

याप्रमाणे सवलत प्रदान करण्यात आली आहे. दोन तिमाही एकूण ५६ लाख ८० हजाराची सवलत शेतकऱ्यांना मिळाली आहे. उर्वरित ३६ हजाराहून अधिक शेतकऱ्यांना लाभ द्यायचा बाकी आहे. शासन याबाबत सकारात्मक आहे व हा लाभ त्या सर्व शेतकऱ्यांना त्वरित देण्याचे निर्देश पालकमंत्री यांनी दिले. आजच्या बैठकीत वीज वितरण कंपनीच्या वाहिनी विलगीकरण तसेच जुन्या तारा बदलणे, रोहित्र बदलणे या नियमित कामासह दुष्काळ सदृश्य स्थितीत दिला गेलेला लाभ व कृषी वीज पुरवठ्यासाठी जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या तरतुतीतील कामांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात विद्युत वाहिनी पुनर्गठण अर्थात आरडीएसएस अंतर्गत विविध कामे प्रस्तावित आहेत. या कामांचा आढावा घेताना ही कामे गतिमान व कालबद्ध पद्धतीने उद्दिष्ट ठरवून पूर्ण करण्याच्या सूचना मुंडे यांनी यावेळी केल्या. विविध तालुक्यात वीज मंडळाचे काम करणाऱ्या बाह्य यंत्रणांची संख्या कमी आहे यामुळे त्वरित खंडित वीज पुरवठा सुरळीत करणे शक्य होत नाही हे लक्षात घेऊन विभागनिहाय या यंत्रणांची संख्या वाढवून त्वरित सेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनातून वीज वितरण कंपनीने पावले उचलावित. असे पालकमंत्री म्हणाले. कृषी पंप जोडणी जिल्ह्यात आजमितीस कृषी पंपासाठी वीज पुरवठा मागणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ४७७० आहे. ही जोडणी मार्च अखेर पूर्ण होणे अपेक्षित असले तरी याला गती देऊन ही सर्व जोडणी डिसेंबर २०२४ पूर्वी पूर्ण करा अशा प्रकारचे निर्देश मुंडे यांनी यावेळी दिले. शेतकऱ्यांना दिवसा आठ तास व रात्री दहा तास विद्युत पुरवठ्याचे लक्ष समोर ठेवून कामे करा व त्या सर्व कामांना गती द्या, असेही पालकमंत्री यावेळी म्हणाले. कृषी पंप जोडणीतील काही पुरवठा प्रकरणे सौर विद्युत द्वारे पुरवठा झाल्यास सर्व शेतकऱ्यांना वीज उपलब्ध करून देण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. या सर्वांसाठी पाठपुरावा करून कामे करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन पालकमंत्र्यांनी केले. ज्या कामासाठी वीज वितरण कंपनीचा निधी उपलब्ध नाही ती कामे होण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून तरतूद करण्यात येते. या मधून होणारी कामे देखील कालबद्ध पद्धतीने पूर्ण करा अशा सूचना श्री मुंडे यांनी यावेळी दिल्या.

एसआयटी रद्दवरून जरांगेंचा

उतरेल व विधानसभा निवडणूक देखील लढवणार, असेही ते म्हणाले.

शहागड येथे कार्यालय स्थापणार

मी समाजासाठी लढत आहे, कुठेही असलो तरी माझे आंदोलन सुरूच आहे. मंत्री देसाई यांनी सांगितल्याप्रमाणे लवकरच सर्व समाजाची बैठक पार पडणार आहे. आपल्या हक्काचे एक कार्यालय शहागड येथे स्थापन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. अंतरवाली सराटी येथील नागरिकांचे व गावाचे उपकार मी कधीही विसरणार नाही. आता सर्व घडामोडी मुंबईतून घडणार आहे. त्यामुळे सतत गावात गर्दी होऊ नये, यासाठी शहागड येथे कार्यालय सुरु करून तिथून काम पाहणार असल्याचे ते म्हणाले.

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री

येडियुराप्पा चौकशीला सहकार्य करत नसल्याने त्यांच्याविरुद्ध जलदगती न्यायालयाने वॉरंट जारी केले होते. सीआयडी अधिकार्यांनी येडियुराप्पांना चौकशीसाठी हजर राहण्याची नोटीस बुधवारी (दि.१२) बजावली होती. पण येडियुराप्पांनी तत्काळ हजर राहण्यास नकार दिला. आपल्याविरुद्धचा गुन्हा रद्द करण्यात यावा, अशी याचिकाही त्यांनी उच्च न्यायालयात केली आहे. फेब्रुवारी महिन्यात एक महिला आपल्या अल्पवयीन मुलीसह येडियुराप्पांच्या बंगल्यावर मदत मागण्यासाठी गेली होती. त्यावेळी येडियुराप्पांनी हॉलमध्ये आधी दोघींशी चर्चा केली. त्यानंतर मुलीशी स्वतंत्र चर्चा करायची आहे, असे सांगून ते मुलीला स्वतंत्र खोलीत घेऊन गेले. १२ ते १५ मिनिटांनंतर ते बाहेर आले. त्यानंतर मुलीने येडियुराप्पा यांनी आपल्यावर अत्याचार केल्याचे आईला सांगितले. त्यानुसार गेल्या ३ मार्च रोजी येडियुराप्पांविरुद्ध अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला.

आत्महत्या केलेल्या पांडुरंग

कुटुंबासाठी देखील हे कधीही न भरून निघणारे मोठे दु:ख आहे, त्यामुळे संयमाने जय-पराजय घ्यावेत. कोणतीही निवडणूक अंतिम नसते. कुणीही टोकाचा निर्णय घेऊ नये, अशा शब्दात यावेळी धनंजय मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मयत पांडुरंग सोनवणे (वय ३३) यांस एक मुलगा, मुलगी, पत्नी, आई व वडील असा परिवार आहे. या संपूर्ण परिवाराची तसेच दोन्ही लेकरांच्या शिक्षणाची जबाबदारी आपण घेत असल्याचे धनंजय मुंडे यांनी यावेळी सांगितले. दोन्हीही मुलांच्या नावे प्रत्येकी अडीच लाख रुपयांची मुदत ठेव देखील धनंजय मुंडे यांच्या वतीने पांडुरंग यांच्या मुलांना देण्यात येत आहे. यावेळी ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, डीघोळ आंबा गावचे सरपंच बाळासाहेब सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष तानाजी देशमुख, भरत सोनवणे, कैलास सोनवणे, दत्ता सोनवणे आदी उपस्थित होते.

राज्यात चारा डेपो उभारण्यास

असे असले तरी पावसाचे प्रमाण अद्यापही समाधानकारक नसल्याने अनेक गावांना दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. सध्या राज्यात ५१२.५८ लाख मॅट्रिक टन हिरवा चारा तर १४४.५५ लाख मॅट्रिक टन सुका चारा उपलब्ध आहे. हा चारा जून अखेरपर्यंत पुरेल, असा अंदाज शासनाकडून व्यक्त केला आहे. चाऱ्याचे प्रमाण कमी होत असताना शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना जनावरांचे पालन पोषण करताना येणाऱ्या अडचणी कमी व्हाव्यात, म्हणून ३१ ऑगस्टपर्यंत किंवा पावसाचे प्रमाण समाधानकारक होईपर्यंत दुष्काळ सदृष्य भागात चारा डेपो उभारून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी महसूलमंत्र्यांनी केली होती. नुकत्याच पार पडलेल्या पर्जन्यमान आढावा बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याला मान्यता देऊन शासन निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार चारा डेपो संदर्भात शासनाने शासन निर्णय जाहीर करत चारा डेपो उभारण्यास परवानगी दिली आहे.

आम्ही परत येऊ-प्रकाश आंबेडकर

करताना म्हणाले की, सोशल मीडियावर दररोज काँग्रेस समर्थक माझ्यावर आणि वंचित बहुजन आघाडीवर भाजपाची बी-टीम असल्याचा आरोप करतात. मी भाजपाची बी-टीम आहे का? मी त्याच प्रश्नांची वारंवार उत्तरे देऊन थकलो आहे. हा जातीय आरोप प्रत्येक भारतीय मुस्लिमाला विचारलेल्या प्रश्नासारखाच आहे. जसे की, तुम्ही दहशतवादाच्या विरोधात आहात का? भारत किंवा पाकिस्तान क्रिकेट सामन्यात तुम्ही कोणाला सपोर्ट करता? असे मतही यावेळी व्यक्त केले. मी माझे संपूर्ण आयुष्य वर्णद्वेष, भेदभाव आणि दडपशाहीने पीडित लोकांच्या राजकीय हक्कांसाठी लढण्यासाठी समर्पित केले आहे आणि निवडणुकीच्या निकालाची पर्वा न करता मी लढत राहीन, असा निर्धारही यावेळी व्यक्त करत वचन दिले की मी परत येईन. वंचित बहुजन आघाडी परत येईल. आम्ही परत येऊ असेही आपल्या एक्सवरील पोस्टमध्ये त्यांनी स्पष्ट केले.

भिडेवाड्यातील क्रांतिज्योती सावित्रीबाई

यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. विधानभवन पुणे येथे झालेल्या या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, मनपाचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे, मुख्य अभियंता बांधकाम युवराज देशमुख आदी उपस्थित होते. हे स्मारक पार्किंग तसेच तळमजला अधिक तीन असे चार मजल्यांचे करण्याचा बैठकीत घेण्यात आला. पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, त्यांचा जीवनपट दर्शविणारे म्युरल्स किंवा चित्रमय व्यवस्था, वरील मजल्यावर त्यांच्या जीवनातील प्रसंग, कार्याची माहिती स्क्रीनवर दृकश्राव्य स्वरुपात दर्शविण्याची यंत्रणा तसेच त्यांचे लेखन साहित्य त्याशिवाय वरील मजल्यावर मुली, महिलांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्था अशी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री पवार आणि मंत्री भुजबळ यांनी दिले. स्मारकासाठीच्या सभोवतालच्या जागेच्या भूसंपादनासाठी राज्य शासन आणि महानगरपालिका दोन्ही यंत्रणा रक्कम देणार आहे. स्मारकाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रसिद्ध करण्याच्यादृष्टीने गतीने काम करावे, अशाही सूचना यावेळी देण्यात आल्या. सन १९९२ साली पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे राहते घर राष्ट्राला अर्पण करून सदर वास्तू राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.१५ जून २०२४

वैजनाथ देवल कमिटी व पुरोहित संघाने आपसात सुसंवाद साधून भाविकांची गैरसोय दूर करावी –अभयकुमार ठक्कर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

वैद्यनाथ देवल कमिटीने पुरोहित संघासाठी अभिषेक संदर्भात घालून दिलेल्या अटी जाचक आहेत या अटी रद्द कराव्यात या मागणीसाठी पुरोहित संघाने सुरू केलेले आंदोलन योग्य आहे तरी भाविकांची सोय लक्षात घेता देवल कमिटी व पुरोहितांनी आपसामध्ये योग्य समन्वय साधावा व समस्त भाविकांना दिलासा द्यावा अशी मागणी शिवसेना नेते तथा माजी नगराध्यक्ष अभयकुमार ठक्कर यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे

वैद्यनाथ देवल कमिटीने पुरोहित वर्गासाठी घालून दिलेले नियम जाचक असून पुरोहित संघाची अभिषेक सुरू ठेवण्याची पूर्वपार व परंपरागत पद्धत सुरू ठेवावी ही मागणी योग्य असून वैजनाथ मंदिर विश्वस्त समिती व त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या पुरोहित संघाने भाविकांची सोय लक्षात घेऊन आपसात योग्य समन्वय साधावा अशी मागणी समस्त भाविक वर्ग, परळीकर व आम जनतेतून होत आहे.

रेल्वेने खते आणून शेतकऱ्यांसाठी आष्टीत रॅक करा

माजी आ.भीमराव धोंडे यांची कृषीमंत्र्यांकडे मागणी

आष्टी(प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यात मृग नक्षत्राचा पाऊस सर्वदूर चांगला झाल्याने पेरणीच्या कामाला आता वेग आला आहे.

पारंपारिक खरीप पिकाच्या तुलनेमध्ये यंदा उडीद पिकाला शेतकऱ्यानी अधिक पसंती दिली आहे.मृग नक्षत्राची सुरुवात झाली त्याच दिवशी आष्टी तालुक्यात पावसालाही सुरुवात झाली.आष्टी विधानसभा मतदार संघातील विविध भागात गेले दोन-तीन दिवस पेरणी योग्य पाऊस झाला.त्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीसाठी बी- बियाणे घेण्यास कडा,आष्टी,पाटोदा, शिरुर धामणगाव,धानोरा या ठिकाणच्या कृषी सेवा केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी केली होती.आष्टी तालुक्यात खरीप हंगामात मूग, उडीद,सोयाबीन,बाजरी यासारख्या पिकांची लागवड केली जाते मात्र कापसाचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होताना दिसत आहे.कापसाच्या पिकाला सहा महिन्याचा कालावधी लागतो.

त्यातही भावाची चढउतार सुरूच असते.त्यामुळे शेतकऱ्यांचा कापूस पिकाकडे कल आता कमी होताना दिसत आहे.त्याऐवजी शेतकरी उडीद बियाणाची मागणी करताना दिसत आहेत.मूग,बाजरी, सोयाबीन याचेही लागवड प्रमाण सर्वसाधारण असते.आष्टी तालुक्यात विविध भागांमध्ये कांदा पिकाचे प्रमाण वाढले आहे.कांदा हे नगदी पीक असल्याने आणि त्यासाठी कडा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती ही मोठी बाजारपेठ उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी कांदा पिकाकडे आपला कल वाढवला आहे.त्यामुळे उडीद पीक दोन महिन्यात तयार झाल्यानंतर लगेच कांदा पिकासाठी जमीन उपलब्ध होते.त्यामुळे शेतकरी उडीद बियाणाला पेरणीला प्राधान्य देत असल्याचे दिसुन येत आहे.दरम्यान शेतकऱ्यांना रासायनिक खते हवे असल्याने खताची वाहतुक वेळेवरा होत नसल्याने वेळेवर खत मिळत नाही शिवाय वाहतुक खर्च वाढल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दड सहन करावा लागत आहे.त्यासाठी आता कृषी विभागाने वरिष्ठ स्तरावरुन रेल्वे प्रशासनाला विनंती करुन अहिल्यानगर (अहमदनगर) येथुन आष्टी येथे रासायनिक खते रेल्वेने आणावेत व तृथे रक करुन आष्टी,पाटोदा,

शिरुर,जामखेड या चार तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांना खत पुरवठा करावा. त्यामुळे वेळेचा अपव्यय व अर्थीक बचत होण्यास मदत होईल अशी मागणी राज्याचे कृषीमंत्री यांच्याकडे भाजपनेते माजी आ.भीमरावा धोंडे यांनी लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

काल आष्टी तालुक्यातील जळगाव येथील तालुका कृषी कार्यालयात जाऊन कृषी अधिकारी गोरख तरटे यांच्याकडुन खरीप हंगामातील पीक आढावा घेत बि-बियाणे व रासायनिक खतांबाबत चर्चा केली असता रासायनिक खते वाहतुक प्रश्न लक्षात आला असता माजी आ.धोंडे यांनी कृषीमंत्र्याशी संपर्क करुन ही मागणी केली.

माजी आ.धोंडे पुढे बोलताना म्हणाले की,कोणत्याही शासनमान्य कृषी सेवा केंद्रातून बी- बियाणे खरेदी करताना त्याची पावती आणि बियाणाची पिशवी जपून ठेवावी.घरगुती बियाणे असेल तर त्याची योग्य प्रतवारी करून आणि कीड लागू नये म्हणून योग्य प्रक्रिया करून पेरणी करावी असे आवाहन केले.

आष्टी तालुक्याची सर्वसाधारण माहिती

एकूण गावे १७७,लोक संख्या २४३६०७,ग्राम पंचायती १२५,भौगोलिक क्षेत्र हेक्टर १ लाख ५३ हजार २७४ हेक्टर,खरीप हेक्टर – ४६ हजार ७४१ हेक्टर ,रब्बी हेक्टर ६१ हजार २३४ हेक्टर,लागवडी लायक-१ लाख,१७ हजार २३० हेक्टर, तालुक्यातील एकूण खातेदार १ लाख १० हजार ३३०,वन क्षेत्र ४१७० हेक्टर आहे.

कृषी विस्तार व मार्गदर्शनाचे मुद्दे

सुधारित बियाणे वापर,इन सेतू मशागतीची अवलंब,बीयाणे उगवण क्षमता तपासणी मोहीम,बीज प्रक्रिया,सुयोग्य लागवड पद्धती बद्दल मार्गदर्शन,माती परीक्षण,जमिनीचे आरोग्य आदि हुमणी,लष्करी अळी गुलाबी बोंडअळी टोळ धाड () बाबत मतदार संघतील शेतकऱ्यांनी कृषि विभागाचे मार्गदर्शन घ्यावे असे आवाहन माजी आ.भीमराव धोंडे यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना केले. यावेळी शेतीनिष्ठ शेतकरी कैलास आंधळे,उत्तम बोडखे,संभाजी वनवे, राजेश कराड,माजी सरपंच राहुल काकडे,बन्सोडे,शांताराम बनकर,गदादे माऊली, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,मंडळ अधिकारी प्रशांत पोळ,प्रशांत धस आदि शेतकरी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भविष्यात गोरगरिबांच्या हातातली काठी म्हणून काम करण्याचा संकल्प–अजित गालफाडे

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील केंडेपिप्री धानोरा या छोट्याश्या गावात राहून आपल्या समाजकार्याला सुरुवात करणाऱ्या वडवणी तालुका टायगर ग्रुपचे तालुकाध्यक्ष अजित गालफाडे यांनी आपला वाढदिवस विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला.

पसायदान सेवा प्रकल्प
वंचितांचं हक्काचं घर...
Mo.9765335758

टायगर ग्रुप राष्ट्रीय अध्यक्ष पै.डॉ. तानाजी भाऊ जाधव .मराठवाडा अध्यक्ष पै.गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर व मा. नगरसेवक दत्तात्रय (आप्पा) जमाले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. वडवणी तालुक्यात टायगर ग्रुप ला प्रत्येक गाव खेड्यात एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यात अजित गालफाडे यांचा मोलाचा वाटा आहे. टायगर ग्रुप आणि अजित गालफाडे हे जणू समीकरणच वडवणी तालुक्यात आपणास पाहावयास मिळत आहे त्यांनी आजपर्यंत आपले वाढदिवस हे गोरगरिबांच्या कल्याणासाठी उद्धारासाठीच समर्पित केलेले आहे आज त्यांनी आपला वाढदिवस हा वेगवेगळी कार्यक्रम राबवून साजरा करण्याचा संकल्प करून आपल्या कार्यकत्याना तसा सूचना संदेश देण्यात आला यावेळी त्यांनी पसायदान सेवा प्रकल्प ढेक्कनमोहा या ठिकाणी अन्नदानाचा कार्यक्रम केला , वडवणी पोलीस स्टेशन येथे महापुरुषांची प्रतिमा भेट दिली, वडवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी रुग्णांना फळे वाटप केले , तालुक्यातील गाव खेड्यातील तांडा वस्तीवर गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले , झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम राबविला यावेळी अजित गालफाडे मित्र मंडळ व टायगर ग्रुप सदस्य ,प्रदीप होके, वैभव राऊत ,अजिंक्य घोलप, नवनाथ खंडागळे ,अमोल चव्हाण ,राकेश उजगरे ,राजेश कसबे ,अभिजीत पोटभरे ,आकाश गालफाडे ,ईश्वर गालफाडे ,रंजीत गालफाडे ,भोला लोंढे, सुनील खंडागळे ,आदींसह टायगर ग्रुप सदस्य उपस्थित होते.

मी केंडेपिप्री धानोरा यासारख्या छोट्या गावातून आपल्या समाज कार्यास सुरुवात केली आहे गोरगरीब लोकांना माझ्यासारख्या छोट्या शा कार्यकर्त्यांच्या हातून काही तरी मदत मनून मी प्रतेक वेळी माझा वाढदिवस गोरगरीब, वंचित,विद्यार्थी, अनाथ लोक, व रुग्ण यांच्यासोबत साजरा करण्याचा संकल्प केला आहे आणि त्या मुळे या पुढे ही समाज उपयोगी व गोरगरीब जनतेसाठी कल्याणासाठी व उद्धारासाठीच मी काम करणार आहे..

आजपासून आष्टीत रामायणाचार्य ह.भ.प.आक्रुर महाराज साखरे यांची माऊली मंदिरात संगीत रामकथा

आष्टी । प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे २४ व्या.पुण्यतिथीनिमित्त व संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या सप्तशत्तकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अ.भा.



वारकरी मंडळाचे प्रेरणाने ज्ञानेश्वरी पारायण,अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामाकथा ज्ञानयज्ञ सोहळा आष्टी शहरात आज शनिवारपासुन सुरु होत आहे.संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २४ व्या.पुण्यतिथीनिमित्त गेवराई येथील कीर्तन केसरी रामायणाचार्य ह.भ.प. आक्रुर महाराज साखरे यांची संगीत रामकथा दि.१५ ते २२ जुन २०२४ या कालावधीत होणार आहे अशी माहिती माऊली सेवा मंडळाने दिली.

या सप्ताहात काकडा भजन,विष्णु सहस्रनाम,गीतापाठ,पसायदान, ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन,दररोज दुपारी २.३० ते ५.३० संगीत रामायण कथा,सायंकाळी हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकीर्तन नंतर संगीत भजन, हरिजागर आदि धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होणार आहे.शनिवार दि.१५ जुन रोजी नामधारक ह.भ.प.संत आसाराम महाराज केळसांगवीकर यांचे नामसंकीर्तन,रविवार दि.१६ जुन रोजी कडा येथील संत मदन महाराज बिहाणी देवस्थानचे अध्यक्ष रामायणाचार्य ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांचे हरिकीर्तन,सोमवार दि.१७ जुन रोजी गोभक्त ह.भ.प.प्रज्ञाचक्षु मुकुंदकाका जाटदेवळेकर यांचे हरिकीर्तन,मंगळवार दि.१८ जुन रोजी भागवताचार्या ह.भ.प.सोनालीताई फडके (दौंड) यांचे हरिकीर्तन,बुधवार दि.१९ जुन रोजी कीर्तन केसरी तथा रामायणाचार्य ह.भ.प.आक्रुर महाराज साखरे (गेवराई) यांचे हरिकीर्तन,गुरुवार दि.२० जुन रोजी अ.भा.वारकरी मंडळाचे मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष समाजप्रबोधनकार वैराग्यमुर्ती ह.भ.प.रामकृष्ण रंधवे बापु महाराज (पाटोदा) यांचे हरिकीर्तन, शुक्रवार दि.२१ जुन रोजी सकाळी १० ते १२ या वेळात पुण्यकालाचे हरिकीर्तन श्री क्षेत्र वृध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष वै.संत रघुनाथ महाराज उंबरेकर यांचे वंशज ह.भ.प.भागवत महाराज उंबरेकर यांचे हरिकीर्तन तर संध्याकाळी आळंदी येथीला विश्वशांती केंद्राचे मठाधिपती ह.भ.प.सुदाम महाराज पानेगावकर यांचे हरिकीर्तन होणार आहे.शनिवार दि.२२ जुन रोजी सकाळी १० ते १२ यावेळात अ.भा.वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती तपोनिधी ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर,आ.बाळासाहेब आजबे,आ.सुरेश धस,माजी आ. भीमराव धोंडे,माजी आ.साहेबराव दरेकर,बीड जि.प.च्या माजी अध्यक्षा सौ.सविताताई गोल्हार,डॉ.शिवाजी राऊत,सतिषआबा शिंदे,ॲड.साहेबराव म्हस्के,आण्णासाहेब चौधरी,नगराध्यक्ष जिया बेग,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,अशोक मुळे,सरपंच सौ.शालन अशोक मुळे,उपसरपंच डा.जालींदर वांढरे, जि.प.सदस्य, सभापती, उपसभापती,पं.स.सदस्य,सर्व पत्रकार,विविध क्षेत्रातील मान्यवर भाविक भक्त उपस्थित राहणार आहेत.या धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहुन ज्ञानामृत सेवन करावे असे आवाहन माऊली सेवा मंडळाने केले आहे.

मोहसीन शेख व बिबीशन लोंढे यांची शासकीय कामात अडथळा केल्याप्रकरणी निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

फिर्यादी नवनाथ ढाकणे व पोलीस कर्मचारी यांची छत्रपती शाहू वडवणी या केंद्रावर इयत्ता बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेचा बंदोबस्त करीत असताना आरोपी हे परीक्षार्थी नसताना शाळेच्या कंपाऊंडच्या आत मध्ये येण्याची परवानगी नसताना त्यांनी कंपाऊंडच्या आत मध्ये येऊन फिर्यादी यांचे गच्चीस धरले नवनाथ ढाकणे यांच्याशी झटापट करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला म्हणून पोलीस स्टेशन वडवणी येथे दिनांक १९ फेब्रुवारी २०१९ रोजी आरोपी शेख मोहसीन व बिबीशन लोंढे रा.वडवणी यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल केली त्यानुसार आरोपी विरुद्ध गु. र.न.२४/२०२० कलम ३५३,५०४,५०६,३४ भादविनुसार गुन्हा दाखल केला त्यानंतर सदर प्रकरणाचा तपास करून तपासी अंमलदार यांनी दोषारोप पत्र प्रथम वर्ग न्यायदांधिकारी वडवणी येथे दाखल केले सदर प्रकरणातील कलम ३५३ हे अतिरिक्त सत्र न्यायालय येथे चालणारे असल्यामुळे सदर प्रकरण हे मा. अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे वर्ग केले त्यानंतर सरकार पक्षातर्फे आठ साक्षीदार तपासण्यात आले नंतर दोन्ही पक्षाच्या वतीने अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव यांच्यासमोर अंतिम बहस करण्यात आले त्यानंतर.बी.जी.धर्माधिकारी,अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी पुराव्याअभावी आरोपींची निर्दोष मुक्तता

केली आरोपींचे वतीने ॲड. व्ही.बी. लवटे यांनी काम पाहिले व त्यांना ॲड.एल.बी.गवते,ॲड. एस.डी. लंगे ॲड. वी.एन जुजगर यांनी सहकार्य केले.

शेतकऱ्यांच्या मुलांना पहिली ते पदवीपर्यंत मोफत एस.टी.पास सवलत योजना सुरू करा –मनोज फरके

बीड । प्रतिनिधी

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या (बळीराजांच्या) मुलांना मोफत एस.टी. पास सवलत योजना सुरू करा अशी मागणी माजलगाव राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज फरके यांनी शासनाकडे केली आहे.

गेल्या वर्षीच्या दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप वाया गेला व मागील दोन वर्षापासून अतिशय कमी पाऊस यामुळे खरीप हंगामाची पूर्णपणे वाट लागली आहे. तसेच रब्बी हंगाम जेमतेमच आला यातून बाहेर निघण्यासाठी इतर बागायत फळ बागायत शेती बरोबर दरवर्षी रब्बी हंगामाची पेरणी करत आहे. पण या हंगामावर देखील अवकाळी पाऊस,गारपीट,खराब वातावरणामुळे पीक परिस्थिती मोठ्या धोक्यात आली आहे. त्यात कपाशी, मका, सोयाबीन, ऊस आधी पिकांना अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा जसेच्या तसाच असून तो हतबल झाला आहे म्हणून घर संसार व परिवार याचा उदरनिर्वाह करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यात मुलांचे शिक्षण करणे मोठे कठीण व अडचणीचे झाले आहे म्हणून याच्यातून बाहेर निघण्यासाठी किमान जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना तरी पहिली ते पदवीपर्यंत शिक्षणासाठी शाळा महाविद्यालयात जाण्या येण्यासाठी येत्या २०२४/२५ शैक्षणिक वर्षापासून शासनाने मोफत एसटी पास सवलत योजना चालू करावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज फरके यांनी शासनाकडे केले आहे .गाव तिथे एसटी बसची सुविधा उपलब्ध आहे .फक्त सवलत योजना सुरू करण्याची गरज आहे. ही योजना शासनाने सुरू केली तर शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मोठी मदत होईल यामुळे त्यांचे शिक्षण तर थांबणार नाही ते तरी पूर्ण होईल हा शेतकऱ्यांना मोठा आधार व दिलासा मिळेल.

पान ६ वरून...

डॉ.राजेश इंगोले यांची इंडीयन

संघटनेचा अध्यक्ष म्हणून कोरोना काळात सामाजिक बांधिलकीतून विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करून संघटनेला समाजाभिमुख केले. कोरोना काळात शासकीय रूग्णालयात सर्व डॉक्टर्सची मोफत सेवा देण्याचा निर्णय तसेच कोरोना काळात रूग्णालयात उपचार घेत असलेल्या रूग्णांसाठी त्यांचे मनोबल वाढविणारा ‘‘ऑक्सिगान‘‘ हा कार्यक्रम सर्व महाराष्ट्रात गाजला होता. डॉक्टर्सच्या विविध प्रश्नांवर त्यांची आंदोलने गाजली आहेत. नुकताच डॉ.राजेश इंगोले यांच्या नावाचा 'सीफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये समावेश केला गेला आहे. डॉ.राजेश इंगोले यांच्या निवडीबद्दल अंबाजोगाई स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, उपाध्यक्ष डॉ नितीन चाटे, डॉ.विजय लाड, डॉ.श्रीनिवास रेड्डी, सचिव डॉ.सचिन पोतदार, डॉ.अनिल भुतडा, डॉ.अतुल शिंदे, डॉ.सुधीर धर्मपात्रे, डॉ.विनोद जोशी, डॉ.योगेश मुळे, डॉ.उद्धव शिंदे, डॉ.विनोद जोशी, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.संतोष कुंडगिर, डॉ.कृष्णकुमार गित्ते, डॉ.किरण पोतदार, मेजर डॉ नितीन पोतदार, डॉ.शिवराज पेस्टे, डॉ.राहुल डाके, डॉ.दत्तप्रकाश आव्हाड, डॉ.स्नेहल होळंबे, डॉ.मनिषा राठोड, डॉ.हनुमंत चाफेकर, डॉ.दत्ता चिकटलकर, डॉ.संदीप जोगदंड, डॉ.सुहास यादव, डॉ.चंद्रकांत चव्हाण, डॉ.सुनील जाधव, डॉ.लक्ष्मण लाड, डॉ.सचिन चाटे डॉ.अरूणा केंद्रे, डॉ.वैशाली पोतदार, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.ऐश्वर्या चव्हाण, डॉ.दिलीप गायकवाड, डॉ.बाळासाहेब लोमटे, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.एन.पी.देशपांडे, डॉ.उत्तम निसाले, डॉ.मधुसूदन बाहेती, डॉ.प्रताप टेकाळे, डॉ.सिद्धेश्वर बिराजदार यांनी आनंद व्यक्त करीत डॉ.राजेश इंगोले यांना पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तर खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, माजी आमदार संजय दौंड, आमदार पृथ्विराज साठे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा, माजी नगरसेवक एम.ए.हकीम, महादेव आदमाने, वाजेद खतीब, डॉ.प्रा.योगेश सुरवसे यांनीही डॉ.राजेश इंगोले यांच्या निवडीचे स्वागत करून मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. डॉ.राजेश इंगोले हे उत्कृष्ट गायक असून त्यांनी यापूर्वी विविध गायन स्पर्धेत अनेक पारितोषिके पटकावली आहेत. या सोबतच ते उत्तम क्रिकेटपटू असून आय.एम.ए.संघटनेच्या महाराष्ट्र संघात उपकर्णधार म्हणून ही खेळले आहेत. तसेच सध्या ते संघटनेच्या महाराष्ट्र राज्याचे सहसचिव म्हणून ही काम पाहत आहेत. डॉ.इंगोले यांची संघटनेत राज्याच्या या महत्त्वाच्या पदावर पुनर्नियुक्ती झाल्याबद्दल अंबाजोगाईतील सर्व मित्रपरिवार, हितचिंतकातून आनंद व्यक्त होत आहे.

भीक मागून उपजिविका करणाऱ्या व्यक्तींना अन्नदान करून वाढदिवस साजरा करणार - राजेंद्र लाड

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील अंधत्वाने, दिव्यांगत्वाने, गरीबीने त्रासलेले, वेडसरपणाने त्रासलेले व्यक्ती भीक मागून आपली नियमित भटकंती करून शिळे - पाके मागून खाणारे, रुपया दोन रुपये मागून जगणारे व्यक्ती यांना राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा दिव्यांग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी त्यांच्या आज दि.१५ जून २०२४ रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त दिवसभरात जेथे भेटतील तेथे त्यांना अन्नदान करून वाढदिवस साजरा करणार आहेत. या दिवशी राजेंद्र लाड हे कसलाही सत्कार, शाल, श्रीफळ, हार न स्विकारता गरीबांना व दिव्यांग बांधवांना अन्नदान करणार आहेत.

सामाजिक बांधिलकी जपणारे, सर्वधर्म समभावाची जपवणूक करणारे, सर्वांच्या सुख - दुखाःत मिसळणारे, सर्वांशीच मित्रत्वाची भावना ठेवणारे, मान - अपमानाने होरपळून न जाणारे, सततच इतरांना कौतुकाची थाप देणारे, स्पष्ट व बिनधास्त बोलणारे, कसलाही न्यूनगंड न बाळगणारे, शिक्षक नेते, दिव्यांग नेते, उत्कृष्ट संघटन कौशल्य, उत्कृष्ट सुत्रसंचलन, उत्कृष्ट वक्तृत्व, कर्तुत्व, दातृत्व, कुशल प्रशासक, विद्यार्थी प्रिय, दिव्यांग प्रिय, सततच शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्यासाठी धडपडणारे शिक्षक २८ वर्षाची सेवा, कमी वयात तिनशेच्या वरती पुरस्कार, विविध शैक्षणिक व राष्ट्रीय विषयावर शंभरच्या वर लेख व दोनशे च्या वरती कविता लेखन करणारे, शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक व राष्ट्रीय कार्याची आवड असणारे, समाज प्रिय शिक्षक तसेच समाजाच्या भल्यासाठी असलेल्या अनेक योजनांची शासनाकडून जनजागृती केली जाते. यासाठी पोस्टर, बनर, वृत्तपत्र, नाटिका, दूरचित्रवाणी, इंटरनेट, व्हाँटसअप, फेसबुक अशा विविध माध्यमांचा वापर केला जातो. मात्र, ही जनजागृती केवळ शासनाचेच काम नाही, तर एक व्यक्ती म्हणून व आपणही समाजाचे देणे लागतो, या

भावनेतून अनेक योजनांचा प्रचार व प्रसार आपल्या दुचाकीवर बोर्ड लावून तर कधी कॉनर बैठकीतून करत असणारे, शाळेमध्ये विद्यार्थी घडविण्याबरोबरच समाज घडविण्याचेही काम करणारे, समाजाच्या भल्यासाठी असलेल्या अनेक योजनांविषयी सतत समाजजागृती करीत असणारे, स्वतः दिव्यांग असणारे, दिव्यांग व्यक्तींना येणाऱ्या अडीअडचणींची जाणीव असल्याने दिव्यांग क्षेत्रात राज्यभरातील दिव्यांगांना मार्गदर्शन करणारे, सर्वगुणसंपन्न व्यक्तींमत्व राजेंद्र लाड हे आहेत.

राजेंद्र लाड यांना सन २०१६ साली बीड जि. प. चा व महाराष्ट्र शासनाचा जिल्हा व राज्य शिक्षक पुरस्कार एकाचवेळी मिळालेला असून आजपर्यंत त्यांनी दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपक्रम राबवून त्यांना शासनाच्या सोयी - सवलती मिळवून देण्याचे काम केलेले आहे. ते स्वतः दिव्यांग असतांना देखील दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून दिव्यांगांचा जनता दरबार आयोजित करून अधिकारी व पदाधिकारी यांना उपस्थित ठेवून अनेक प्रश्न निकाली काढलेले आहेत. दिव्यांगत्वावर मात करून सदृढ शिक्षकाला लाजवेल असेच शैक्षणिक क्षेत्रात काम केलेले आहे. शौचालय बांधा अन्? पाचशे एक रुपये मिळवा हा एक अनोखा व स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम राबवून दिव्यांगांना आर्थिक मदत केलेली आहे. आष्टी शहरातील शासकीय कार्यालयांना संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान प्रास्ताविकेच्या प्रतिमा भेट दिलेल्या आहेत. पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून जलमित्र म्हणून सहभागी गावांना भेटी देवून दिव्यांग असतांनाही श्रमदान करून स्वतःच्या दुचाकीवर पाण्याविषयी घोषवाक्य लिहून प्रचार व प्रसार केलेला आहे. सर्वधर्माची जपवणूक व्हावी या उद्देशाने रमजान या पवित्र महिन्यात दोन दिवसाचे रोजाचे उपवास करून दिव्यांगांना चांगले दिवस यावेत यासाठी दुवा मागितलेली आहे. तसेच दिव्यांग मतदारांच्या जनजागृतीसाठी निवडणूक आयोगाचे बीड जिल्हास्तरावरील राजदूत म्हणून काम करून स्वावलंबी मतदान केंद्र स्थापन करून एक आगळा - वेगळा उपक्रम राबविलेला आहे. अशा या शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक व राष्ट्रीय कार्यात स्वतःला वाहून घेणाऱ्या आदर्श शिक्षक राजेंद्र लाड यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.१५ जून २०२४

कोंबड्यातील प्राणघातक ‘मानमोडी’ आजार

वेळीच करा नियंत्रण उपाय!

कोंबड्यांना होणारा मानमोडी हा संसर्गजन्य आजार असून यामुळे कुक्कुटपालन व्यवसायाचे अर्थशास्त्र कोलमडून पडते. या रोगामध्ये पक्षांच्या मृत्युचे प्रमाण ५० ते १०० टक्के असते. हे नुकसान टाळायचे असल्यास हा रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय करणे गरजेचे असते. यासाठी लसीकरण हा सर्वात चांगला पर्याय आहे. जाणून घेऊ या रोगाची लक्षणे आणि यावरील उपाय.

मानमोडी आजाराची कारणे : मानमोडी हा रोग पॅरामिक्सो विषाणूंमुळे होतो. हे विषाणू पक्ष्यांचे श्वसनेंद्रिय, पचनसंस्था, मज्जासंस्था व यकृत यांसारख्या अवयवांवर परिणाम करतात.

या रोगाचा प्रसार हवेद्वारे, आजारी पक्ष्यांच्या विष्ठेद्वारा व श्वसना द्वारे होतो. आजारी पक्ष्यांमुळे पक्षी घरातील वातावरण, उपकरणे व काम करणाऱ्यांच्या कपड्यांवर हे विषाणू मोठ्या प्रमाणात जमा होतात. हे विषाणू वातावरणात बराच वेळ टिकून राहतात. दूषित खाद्य व पाणी, मेलेले पक्षी उघड्यावर टाकणे, लिटर, अंडी उबवणूक यंत्र, इ. पासून या रोगाचा प्रसार होतो. इतर जातींच्या पक्ष्यांना सुद्धा हा रोग होतो व हे पक्षी रोगप्रसारास कारणीभूत ठरतात.

मानमोडी आजाराची लक्षणे : या रोगाची लक्षणे, मृत्यूचे प्रमाण, तीव्रता ही विषाणूंचा प्रकार, पक्ष्यांचे वय, लसीकरण, रोगप्रतिकारक शक्ती, साथ, वातावरण व व्यवस्थापन यावर अवलंबून असतात. मोठ्या पक्ष्यांमध्ये अधिकाधिक पक्षी एका रात्रीत आजारी पडतात. पक्ष्यांना पाण्यासारखी हिरवट रंगाची संडास होते, पंख व पाय अधू होतात. मान वाकडी होते. अंडी देण्याचे प्रमाण घटते. कवच मऊ होते व अंड्याचा आकार बदलतो तसेच पांढरा बलक पाण्यासारखा पातळ होतो. श्वास घेताना मोठा आवाज होतो. तोंडाने श्वासोच्छवास करतात. लहान पिलांमध्ये हा तीव्र स्वरुपाचा आजार असून श्वसनाची व मज्जासंस्थेची लक्षणे दिसून येतात, पिल्ले व तलंग सुस्त व अशक्त दिसतात. पक्ष्यांना चालता येत नाही, थरथर कापतात व लंगडतात. डोळा आणि गळ्याला सुज येते.

उपचार : या रोगावर परिणामकारक उपचार उपलब्ध नाही, परंतु या रोगानंतर होणाऱ्या जिवाणूजन्य रोगांवर उपचार म्हणून प्रतिजैविकांचा वापर करण्यात येतो. आजारी पक्षी वेगळे काढावे. मृत पक्ष्यांना जाळून टाकावे. दूषित पाणी व खाद्य नष्ट करावे. ऑल इन ऑल आऊट व्यवस्थापन पद्धत राबवावी. शेडचे फ्युमीगेशन (३० मि.लि. फॉर्मेलीन व २० ग्रॅम पोटॅशिअम परमँगनेट) करावे.

लसीकरण : पिल्ले आणल्यानंतर सहाव्या दिवशी लासोटा लस डोळ्यांतून एक थेंब द्यावी व त्यानंतर बूस्टर डोस सहाव्या आठवड्यात पाण्यातून देऊन लसीकरण करावे. अंडी देणाऱ्या पक्ष्यांमध्ये दर सहा आठवड्यांनी पाण्यातून लसीकरण करावे. लस सहाव्या आठवड्यात व बूस्टर डोस १५ व्या आठवड्यात इंजेक्शनद्वारे पंखाखाली द्यावी. पक्ष्यांना लसीकरणापूर्वी दोन ते तीन दिवस आधी पाण्यातून जंतनाशक औषध द्यावे.

या’तारखेला जमा होणार किसानचा १७ वा हप्ता

शेतकऱ्यांसाठी मोठी आणि दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधीचा हप्ता कधी मिळणार अशी सर्वत्र चर्चा सुरु होती. अखेर पंतप्रधान किसान सन्मान निधीची तारीख निश्चित झाली आहे. येत्या १८ जून रोजी किसान योजनेचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काशीतून या १७ व्या हप्त्याचे वितरण करण्यात येणार आहे. किसान सन्मान निधीची प्रतीक्षा आता संपली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १७ व्या हप्त्याचे पैसे काशीमधून योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात सोडणार आहेत. याआधी १० जून रोजी पीएम मोदींनी पीएम किसान योजनेच्या फाइलवर स्वाक्षरी केली होती. त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील ही पहिली फाईल होती, जी त्यांनी पास केली आहे. शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या या योजनेच्या १६ हप्त्यांमध्ये आतापर्यंत १२ कोटी ३३ लाखाहून अधिक लाभार्थ्यांना ३ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम डीबीटीमधून थेट वितरित करण्यात आली आहे.

१६ वा हप्ता २८ फेब्रुवारीला वितरीत केला होता

मोदी ३.० सरकारचा पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या हितासाठी घेण्यात आला आहे,.ज्या अंतर्गत किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता १८ जून २०२४ रोजी जारी केला जाईल. आत्तापर्यंत केंद्र सरकारने पीएम किसानचे १६ हप्ते लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवले आहेत. पीएम किसान योजनेचा १६ वा हप्ता (पीएम किसान १६ वा हप्ता) २८ फेब्रुवारी २०२४ रोजी हस्तांतरित करण्यात आला होता.

२०,००० कोटी रुपये वितरित केले जाणार : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० जून रोजी किसान निधीचा १७ वा हप्ता जारी करण्यासाठी त्यांच्या पहिल्या फाईलवर स्वाक्षरी केली होती. ज्यामध्ये ९.३ कोटी शेतकऱ्यांना १७ वा हप्ता देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. सुमारे २०,००० कोटी रुपये वितरित केले जाणार आहेत. त्यामुळं ही देशातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी आहे.

१८ जूनला पंतप्रधान मोदींचा कसा असेल दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १८ जूनला काशी येथे शेतकरी परिषद घेणार आहेत. याबाबतची माहिती भाजप काशी प्रदेशाध्यक्ष दिलीप पटेल यांनी अधिकारी व कार्यकर्त्यांना दिली. शेतकरी परिषदेला संबोधित केल्यानंतर पीएम मोदी हे बाबा श्रीकाशी विश्वनाथ यांची पूजा करतील. यानंतर पंतप्रधान मोदी स्थानिक दशाश्वमेध घाटावर गंगा आरतीमध्ये सहभागी होतील.

शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी ही पद्धत वापरा

राज्यात सध्या मुसळधार पावसाला सुरुवात झाली असून काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्याचीही नोंद झाली आहे. खरीप पेरण्यांच्या सुरुवातीला अत्याधिक पाऊस झाल्याने शेतात पाणी साठले जाऊ लागले तर पिकांसाठी हे हानिकारक ठरू शकते. शेतात जमा झालेल्या पाण्यामुळे पिकांच्या मुळांना ऑक्सिजन मिळण्यास अडथळे निर्माण होतात, मातीची धूप होऊ शकते.

परिणामी पिकांना रोग व किडीचा सामना करावा लागू शकतो. यासाठी वेळीच जमिनीवर साठलेले अतिरिक्त पाणी काढून टाकण्याचा तज्ज्ञ सल्ला देतात. यासाठी कोणते उपाय करावेत ते जाणून घेऊ या.

शेतात चर काढणे

अनेक शेतकरी अतिरिक्त साठलेल्या पाण्याला वाहून जाण्यासाठी शेतात चर काढून पाणी काढतात. शेतात वेगवेगळ्या आकाराचे आणि खोलीचे चर काढल्याने शेताच्या उताराच्या दिशेने पाणी वाहून जाते.

वाफे तयार करणे

जमिनीत मुरून साठलेल्या अतिरिक्त पाण्याला वाहून जाण्यासाठी वाफा पद्धत प्रभावी मानली जाते. रूंद वाफा आणि त्यामध्ये सरी तयार करून अतिरिक्त पाण्याचा प्रवाह या पद्धतीत नियंत्रित करता येतो. ही पाण्याचा निचरा करण्याची आधुनिक पद्धत मानली जाते. यात रूंद सरी वरंबा पद्धतही प्रामुख्याने वापरली जाते.

पाण्याचा निचरा

निचरा प्रणाली हा पाण्याचा निचरा करण्याचा सोपा मार्ग आहे. यात शेताच्या उताराच्या दिशेने चर खोदले जाते. ज्यात नैसर्गिकरित्या पाणी वाहून अतिरिक्त पाण्याचा निचरा होतो. ही पद्धत जमिनीच्या पृष्ठभागावर साठलेल्या अधिकच्या पाण्याचा प्रवाह नियंत्रित करण्यात मदत करते.

शेतजमिनीला उतार देणे

अनेक शेतकरी पारंपरिक जमिनीला उतार देण्याची पद्धत आजही वापरतात. हा अतिशय सोपा व प्रभावी उपाय मानला जातो. जेणेकरून पाणी नैसर्गिकरित्या वाहून जाते. पावसाच्या दिशेने किंवा नैसर्गिक जल वाहिन्या ज्या दिशेने असतील त्या बाजूने देखील उतार केला जातो.

मुलस्थानी जलसंधारण

या पद्धतीत शेताच्या उताराला आडवी पेरणी करतात. उताराच्या दिशेने चर तयार करून सरींच्या मध्ये आडवी पेरणी केली जाते. असे केल्याने जमिनीवरील माती तिथेच अडवली जाते. आणि वाहून जाणारे पाणी मुरून संरक्षित पाण्याचा स्त्रोत तयार होतो. वाहून जाणाऱ्या पाण्याला अडवण्यासाठी उताराला आडवी पेरणी केल्याने संरक्षित पाणी मिळते. यामुळे जमिनीची धूप थांबण्यास सुद्धा मदत होते.

तूर लागवड करताना वेळेचे गणित जूळविण्याची गरज

कडधान्य पिकांपैकी तूर हे मुख्यत्वेकरून खरीप हंगामात घेतले जाणारे महत्त्वाचे पीक आहे. तूर पिकाची सलग तसेच मिश्र पीक म्हणून लागवड केली जाते. तूर पिकाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार योग्य वाणांची निवड, वेळेवर पेरणी, बीजप्रक्रिया, रासायनिक खतांचा शिफारशीप्रमाणे वापर, ओलित व्यवस्थापन, पीक व्यवस्थापन तसेच तण नियंत्रण या महत्त्वाच्या बाबी आहेत.

जमीन : साधारणपणे ६.५ ते ८.५ दरम्यान आम्ल विम्ल निर्देशांक असलेली जमीन लागवडीसाठी योग्य ठरते. मध्यम ते अति काळी तसेच कसदार भुसभुशीत पोताची, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन तूर पिकासाठी योग्य आहे. तूर पीक घेताना पिकाची फेरपालट होणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे मुख्यतः मर व वांझ रोग तसेच किडींचे प्रमाण कमी राहून उत्पादन वाढीस मदत होते. एकाच जमिनीत दरवर्षी तूर लागवड करणे टाळावे.

पूर्वमशागत : उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरणी करून जमीन उन्हामध्ये चांगली तापू द्यावी. शेतातील पीक अवशेष, पालापाचोळा गोळा करून शेताची स्वच्छता करावी. त्यानंतर कुळवाच्या दोन ते तीन पाळ्या देऊन जमीन चांगली भुसभुशीत करावी. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी हेक्टरी १० ते १२ गाड्या चांगले कुजलेले शेणखत किंवा सेंद्रिय खत किंवा कंपोस्ट शेतात पसरवून जमिनीत चांगले मिसळून घ्यावे.

पेरणीची वेळ : साधारणतः ७५ ते १०० मि.मि. पाऊस झाल्यानंतर पेरणी करणे फायदेशीर ठरते. म्हणजेच १५ जून ते १५ जुलै या दरम्यान तूर पिकाची पेरणी करावी. जास्तीत जास्त ३० जुलैपर्यंत पेरणी पूर्ण करावी. कारण, पेरणीस जसजसा उशीर होईल तसे उत्पादनात घट येते. पेरणीस साधारण १५ दिवस विलंब झाल्यास उत्पादनात २५ ते २७ टक्के घट येते. पेरणीस ३० दिवस उशीर झाल्यास, उत्पादनात ५० ते ५८ टक्के घट होते. पेरणीस सरासरी जितका उशीर होईल तसे प्रतिदिन ८० किलो प्रति हेक्टर प्रमाणे उत्पादनात घट होते.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास, थायरम ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ते ५ ग्रॅम प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. यामुळे पेरणीनंतर जमिनीतील मुळकुजव्या रोगाच्या जिवाणूंमुळे बियाणांचे तसेच अंकुरलेल्या रोपांचे नुकसान टाळले जाते. तुरीच्या बियाणास चवळी गटाचे रायझोबियम जिवाणू खते लावल्यास उत्पादनात साधारण १० ते २२ टक्के वाढ मिळते.

खत व्यवस्थापन : पेरणीच्या वेळी हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ३० किलो पालाश याप्रमाणे रासायनिक खतांची मात्रा द्यावी. शिफारशीत खताची मात्रा वेगवेगळ्या खतांद्वारे जसे, ५० किलो युरिया, ३०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश प्रति हेक्टर किंवा १२५ किलो डाय अमोनिअम फॉस्फेट प्रति हेक्टर प्रमाणे देता येईल. माती परिक्षण अहवालानुसार आवश्यकता भासल्यास, २० ते २५ किलो गंधक तसेच १५ किलो झिंक सल्फेट प्रति हेक्टर प्रमाणात द्यावे.

आंतरमशागत : तूर बियाची उगवण झाल्यानंतर साधारणपणे १० ते १५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एक किंवा दोन रोपे ठेवावीत. तुरीचे पीक पेरणीनंतर सुरवातीला अतिशय सावकाश वाढते. त्यामुळे पेरणीनंतर साधारण ६० ते ९० दिवस पीक तणमुक्त ठेवणे आवश्यक आहे. त्याकरिता कमीत कमी दोन वेळा निंदणी करावी. पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी पहिली कोळपणी आणि त्यानंतर २० ते २५ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात.

वाण निवड : तूर पिकाच्या परिपक्वता कालावधीनुसार वाणांचे वर्गीकरण केले जाते. अति लवकर होणारे वाण : १३० दिवसांच्या आत. लवकर परिपक्व होणारे वाण : १३१ ते १५० दिवस. मध्यम लवकर तयार होणारे वाण : १५१ ते १६५ दिवस. मध्यम कालावधीचे वाण : १६६ ते १८५ दिवस. उशिरा परिपक्व होणारे वाण : १८६ दिवसांपेक्षा अधिक. जमीन, पर्जन्यमान आणि पीक पद्धतीचा विचार करून लागवडीसाठी योग्य वाणाची निवड करावी.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१६६७ : वैद्यकीय इतिहासात प्रथम रक्तदान करण्यात आले. जाँ बाप्तिस्ते डेनिस या डॉक्टरने १५ वर्षे वयाच्या एका फ्रेंच मुलाच्या शरीरात कोकराचे रक्त टोचले. त्या मुलाला काहीही अपाय झाला नाही, पण नंतर सर्वच माणसांना असले रक्तदान सोसत नाही हे स्पष्ट झाले.
१७६२ : ऑस्ट्रिया देशांत कागदी नोटाचे चलन सुरु करण्यात आले.
१७७५ : अमेरिकन क्रांती जॉर्ज वॉशिंग्टनची खंडीय सेनेच्या नेतेपदी नेमणूक.
१८४४ : चार्ल्स गुडइयरने रबराच्या व्हल्कनायझेशनचे पेटंट घेतले.
१८६९ : महाराष्ट्रातील पहिला विधवा विवाह साजरा झाला. श्री. पांडूरंग विनायक करमरकर यांनी वेणुताईच्या गळयात माळ घातली.
१९०८ : साला कलत्ता शेअर बाजाराची माहिती देण्यात आली
१९१९ : कॅप्टन जॉन अलकॉक व लेफ्टनंट आर्थर ब्राऊन यांनी विमानातुन सर्वप्रथम अटलांटिक महासागर पार केला.
१९४७ : अखिल भारीय काँग्रेस दिल्ली येथे भारताचे विभाजन करण्यासाठी ब्रिटीश योजनेचा स्वीकार केला.
१९७० : बा. पां. आपटे पुणे विद्यापीठाचे आठवे कुलगुरू झाले.
१९९३ : संपूर्ण देशी बनावटीच्या सहा ’अर्जुन’ रणगाड्यांची पहिली तुकडी लष्कराकडे सुपूर्त करण्यात आली.
१९९४ : इस्त्रायल व व्हॅटिकन सिटी यांमधे पूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९९७ : अजामीनपात्र गुन्ह्याचा आरोप असलेली व्यक्ती फरारी होऊन आरोप चुकवत असेल, तर तिच्यावर आरोपपत्र दाखल नसतानाही न्यायमूर्ती अटक वॉरंट जारी करू शकतात असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला.
२००१ : प्रसिद्ध भारतीय बुद्धिबळ पटू ग्रँडमास्टरविजयालक्ष्मी सुब्रह्मण्यम यांनी नॅशनल ‘ए’ विस्डम स्पर्धा सलग पाचव्यांदा जिंकून विश्वविक्रम रचला.
२००२ : नियर अर्थ ॲस्टेरॉइड २००२ एम.एन. पृथ्वीपासून फक्त १,२०,००० कि.मी. (७५,००० मैल) दूरून गेला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७८ : भारतीय-अमेरिकन गोल्फर मार्गारेट ॲबॉट यांचा जन्म. (मृत्यू: १० जून १९५५)
१८८४ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील ब्रिटीशविरोधी बंगाली भारतीय क्रांतिकारक आणि आंतरराष्ट्रीयतावादी विद्वान तारकनाथ दास यांचा जन्मदिन.
१८९८ : पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक गजानन श्रीपत तथा अण्णासाहेब खेर यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट १९८६)
१८९९ : भारतीय सैन्य दलाचे माजी सैन्य प्रमुख जनरल महाराज श्री राजेंद्रसिंह जडेजा यांचा जन्मदिन.
१८९९ : साल पद्मभूषण पुरस्कार प्रसिद्ध भारतीय चित्रकार, शिल्पकार आणि ललित कला अकादमीचे संस्थापक अध्यक्ष देवी प्रसाद राय चौधरी वाढदिवस.
१९०७ : स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील नेते आणि समाजवादी विचारवंत ना. ग. गोरे यांचा जन्म. (मृत्यू: १ मे १९९३)
१९१२ : प्रसिद्ध उत्तर भारतीय साहित्यकार श्रीमन्नारायण अग्रवाल यांचा जन्मदिन.
१९१७ : संगीतकार मेंडोलीनवादक सज्जाद हुसेन यांचा जन्म. (मृत्यू: २१ जुलै १९९५ माहीम, मुंबई)
१९२३ : साहित्यिक केशवजगन्नाथ पुरोहित ऊर्फ शांताराम यांचा जन्म.
१९२७ : भारतीय-पाकिस्तानी कवी आणि लेखक इब्न-ए-इनशा यांचा जन्म. (मृत्यू: ११ जानेवारी १९७८)
१९२८ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी लेखक, समिक्षक, शिक्षक. ललित लेखक, उत्तम वक्ता व सूत्रसंचालक साहित्यकार शंकर वैद्य यांचा जन्मदिन.
१९२९ : गायिका व अभिनेत्री सुरैय्या जमाल शेख ऊर्फ सुरैय्या यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जानेवारी २००४)
१९३२ : झिया फरिदुद्दीन डागर धृपद गायक (मृत्यू: ८ मे २०१३)
१९३३ : महाराष्ट्रीयन मराठी लेखिका, समिक्षक, ललितलेखन, चरित्रलेखन, समीक्षा साहित्याच्या साहित्यकार तसचं, महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्थेच्या माजी संचालक सरोजिनी वैद्य यांचा जन्मदिन. (मृत्यू: ३ ऑगस्ट २००७)
१९३४ : भारतीय राजकारणी व राज्यसभेचे सदस्य देवदास आपटे यांचा जन्मदिन.
१९३७ : किसन बाबूराव तथा ‘अण्णा‘ हजारे आदर्श ग्रामपरिवर्तन करुन देशाला व जगालाही समाजपरिवर्तनाची नवी दिशा दाखवणारे समाजवेवक
१९४३ : माजी भारतीय क्रिकेटपटू तपन बॅनर्जी यांचा जन्मदिन.
१९४७ : प्रेमानंद गज्वी साहित्यिक व नाटककार. ‘किरवंत’ हे प्रसिद्ध नाटक, ११ एकांकिका, १३ नाटके, २ लघुकथासंग्रह, १ कादंबरी, १ कवितासंग्रह अशी त्यांची विपुल साहित्यसंपदा आहे. ‘घोटभर पाणी’ (१९७७) या त्यांच्या एकांकिकेचे ३००० हुन अधिक प्रयोग झाले आहेत. २००३ मध्ये त्यांनी ‘बोधी नाट्य परिषदेची’ स्थापना केली.
१९५० : भारतीय स्टील उद्योग सम्राट व जगातील सर्वात मोठ्या स्टीलमेकिंग कंपनी आर्सेलर मित्तलचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मी मित्तल यांचा जन्मदिन.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३४ : योगी चैतन्य महाप्रभू (जन्म: १८ फेब्रुवारी १४८६)
१८७८ : भारतातील ‘राधा स्वामी सत्संग’ पंताचे संस्थापक शिव द्याल साहब यांचे निधन.
१९३१ : अर्वाचीन मराठीतील सुलभ लेखन शैलीचे प्रवर्तक, संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे निधन.
१९७९ : सूर्यकांत रामचंद्र खांडेकर कवी व गीतकार (जन्म: २ एप्रिल १९२६)
१९८३ : श्रीरंगम श्रीनिवास राव ऊर्फ ’श्री श्री’ साहित्य अकादमी पुरस्कार विजेते तेलगु कवी व गीतकार (जन्म: ३० एप्रिल १९१०)
१९९६ : निर्मलादेवी पतियाळा घराण्याच्या ठुमरी व दादरा गायिका आणि चित्रपट अभिनेत्री. बॉम्बे सिनेटोन या कंपनीतून त्यांनी आपल्या चित्रपट कारकीर्दीस सुरुवात केली. सवेरा (१९४२), कानून (१९४३), गाली (१९४४), चालीस करोड (१९४६), अनमोल रतन (१९५०), चक्रम (१९६८), सती अनसूया (१९७४) हे त्यांचे काही चित्रपट आहेत. सवेरा, कानून, शमा परवाना, बावर्ची, राम तेरी गंगा मैली इत्यादी चित्रपटांत त्यांनी पार्श्वगायनही केले आहे. ९० च्या दशकातील सुपरस्टार गोविंदा हा त्यांचा मुलगा आहे. (जन्म: ७ जून १९२७)
२००६ : प्रसिद्ध भारतीय गायिका व गीतकार तसचं, पंजाबी लोकगीत गायक, व हिंदी चित्रपट पार्श्वगायिका सुरिंदर कौर यांचे निधन.

लिंबागणेशकरांचा वारंवार खंडित वीजपुरवठ्याचा प्रश्न सुटला

ट्रान्सफॉर्मर जळाला आणि २ तासातच नविन मिळाला

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील ट्रान्सफॉर्मरची फ्युज पेटीची विजेच्या साहित्य अभावी कित्येक दिवसांपासून दुरावस्था होती. तुटलेली फ्युज,जळालेली केबल,पेटीला सुरक्षा कवच नव्हते त्यामुळे वारंवार रात्री अपरात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांना अंधारात रात्र काढावी लागत असे त्यामुळे नविनच फ्युज पेटी बसविण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी, हरिओम क्षीरसागर, कैलास गायकवाड, पांडुरंग वाणी, बशीर शेख,अभय वनवे यांनी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश विजय हुलकुडे यांना केली होती.त्यानंतर लगेचच मागणी मान्य करत नविन फ्युज पेटी बसविण्यात आली.त्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास सोडला असुन वारंवार वीजपुरवठा खंडित होणार नाही व या परीसरातील दुध डेअरी मालक, बँक सुविधा फब्रीकेशन,दवाखाने व ईतर व्यावसायिक यांची अडचण काही प्रमाणात दुर होण्यास मदत होणार आहे.

ग्रामीण भागात ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. रात्र अंधारात काढावीच लागतो परंतु ईतर अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.महावितरणकडुन ट्रान्सफॉर्मर जळाला किंवा नादुरुस्त झाला तर ३ दिवसात बदलुन मिळेल म्हणत त्यासाठी स्थानिक मंडळ स्तरावरील कार्यकारी अभियंता व विभागाला माहिती देण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक ७८७५७६२००७ प्रसारित करण्यात आला असला तरी ३ दिवसात ट्रान्सफॉर्मर मिळेल याची खात्री देता येत नाही. मात्र लिंबागणेशकरांना याचा सुखद अनुभव आला असुन लिंबागणेश बसस्थानक येथील ट्रान्सफॉर्मर सायं ५ वाजता जळाल्याची माहिती डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी विजय हुलकुडे उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश यांना दिल्यानंतर त्यांनी अवघ्या दोन तासात सायं ७ वाजता नविन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिला.आणि रात्री लगेचच नविन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला यासाठी महावितरणचे कर्मचारी वैष्णव सुरवसे, युवराज सुरवसे तसेच अंकुश गायकवाड,तुकाराम गायकवाड व सहकाऱ्यांनी रात्रीतुन ट्रान्सफॉर्मर बसविला.याबद्दल उप अभियंता विजय हुलकुडे यांचे ग्रामस्थांनी आभार मानले.

संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र निधीची वितरण करा- रोहन गलांडे

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षेत्रासाठी ५० लाख रुपये निधी मंजूर झालेला असुन सुद्धा निधीचे वितरण केले जात नाही व मंदीराच्या विकास कामास सुरुवात केली जात नाही तरी निधीचे वितरण करुन श्री संत नामदेव महाराज तीर्थ क्षेत्राचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे यासाठी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील दि.१७ /०६/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ६ वाजता आमरण उपोषणास बसणार आहे असे रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील तीर्थक्षेत्र विकास कामांसाठी श्री संत नामदेव महाराज मंदिर चिंचोली माळी ता.केज जि.बीड तीर्थक्षेत्रासाठी ५० लाख निधी मंजूर झालेला असुन अनेक दिवसांपासून निधीचे वितरण करण्यस विलंब होत आहे.

तरी तात्काळ ५० लाख निधीचे वितरण करुन विकास कामास सुरुवात नाही झाल्यास दि.१७/०६/२०२४ रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे सायं ६ वाजता अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील आमरण उपोषणाला सुरुवात करणार आहेत अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभाग केज, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे.

थोडक्यात

सोमवारी जिल्हा नियोजन समितीची बैठक

बीड । प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेत जिल्हा नियोजन समितीची बैठक येत्या सोमवारी आयोजित करण्यात आली आहे.येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात दिनांक १७ जून २०२४ सोमवारी दुपारी दोन वाजता जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री मुंडे यांच्या अध्यक्षतेत आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीत बीड जिल्ह्यातील विकास कामांविषयी प्रस्तावित निधी बाबत आढावा व चर्चा होणार आहे. या बैठकीस जिल्ह्यातील आमदार, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक , जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित राहतील.

तेलबिया उत्पादक एकात्मिक कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पध्दतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन कापूस,सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे या उद्देशाने राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालू खरिप हंगाम मध्ये खालील निविष्ठा पुरविण्यात येणार आहेत नॅनो युरिया सोयाबीन नॅनो डीएपी सोयाबीन (अर्ज करण्याचा कालावधी १ जून ते ३० जून,२०२४)नॅनो युरिया कापूस नॅनो डीएपी कापूस मेटाल्डीहाइड सोयाबीन (अर्ज करण्याचा कालावधी १२ जून ते २३ जून,२०२४ या निविष्ठांचा पुरवठा करण्याकरिता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर दि. १२ जुन २०२४ पासून सदर बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. बियाणे, औषधे व खते या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी.या वेबसाईट वर जाऊन ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

युवा शक्ती शिबिराचे आयोजन

बीड: केज मतदार संघातील औद्यागिक प्रशिक्षण संस्था केज आणि अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यामाने आमदार श्रीमती नमिता मुंदडा यांच्या उपथ्सातीत 'छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिर'स्थळ मुंकुदराज सांस्कृतीक सभागृह नगरपरिषद, अंबाजोगाइ येथे दि. १८ जून २०२४ सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ माजलगाव,केज मतदार संघातील सर्व शाळा व महाविद्यालयाचे विद्यार्थी, सर्कलमधील विद्यार्थी यांनी घ्यावा. असे आवाहन अंबाजोगाई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

अण्णासाहेब पाटील अर्थिक विकास महामंडळची बैठक

बीड । प्रतिनिधी

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत दि. १८ जून २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे महामंडळाच्या योजनांबाबत बीड जिल्हयाचे उपनिबंधक मुख्य जिल्हा निबंधक तसेच जिल्हयातील सर्व बँकेचे जिल्हा समन्वयक यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, सर्व बँकेचे जिल्हा समन्वयक यांनी वरील तारखेस सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात अद्यावत माहितीसह उपस्थित रहावे, असे महसूल १ चे तहसीलदार अविनाश शिंगटे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

रक्तदात्या शेख आयेशा जिल्हा शल्य चिकित्साकडून सन्मानित

बीड । प्रतिनिधी

जागतिक रक्तदाता दिनानिमित्त शासकीय जिल्हा रुग्णालय बीड येथील कार्यक्रमात जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक बडे यांनी नऊ वेळा रक्तदान करणाऱ्या रक्तदात्या शेख आयेशा यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, झाड भेट देऊन स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

बीड येथील शासकीय जिल्हा रुग्णालय येथे शुक्रवार दिनांक १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.नागेश चव्हाण यांच्यासह डॉ. देशपांडे, डॉ.फटाले, डॉ. माजेद, डॉक्टर धुत, डॉ.नाईकवाडी, डॉ.कट्टे, रक्तपेढीचे काळे यांच्यासह वैभव स्वामी, महेंद्र मुधोळकर, ज्ञानोबा वायबसे, नयना भाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक बडे म्हणाले, महिला शक्यतो रक्तदान करत नाहीत. रक्तदान करण्याबाबत अनेकांच्या मनामध्ये भीती असते.वास्तविक रक्तदान केल्याने शरीराचे काहीही नुकसान होत नाही.उलट फायदे होतात. समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी पत्रकार शेख आयेशा यांच्यासारखे रक्तदाते पुढे येणे काळाची गरज आहे. त्या अल्पसंख्यांक असताना सुद्धा त्यांनी आज पर्यंत नऊ वेळा रक्तदान करून खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यातील महिलांसमोर एक आदर्श उभा केला आहे. त्यांच्या रक्तदानाची सामाजिक भूमिका लक्षात घेऊन आज जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्ताने त्यांचे जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, वृक्ष देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवून इतर महिलांनी देखील रक्तदान करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.नाईकवाडे यांनी केले. तर आभार डॉ.कट्टे यांनी मानले. या कार्यक्रमात इतरही रक्तदात्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला आरोग्य प्रेमी नागरिक, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मी रक्तदान करणार अशा स्वरूपाची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

महेश नवमीनिमित्त शोभायात्रेसह विविध कार्यक्रमांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बीड तहसील माहेश्वरी सभेच्या वतीने महेश नवमी महोत्सव २०२४ च्या निमित्ताने शुक्रवार दिनांक १४ ते रविवार दिनांक १६ जुन २०२४ दरम्यान माँ वैष्णो पॅलेस एमआयडीसी रोड बीड येथे विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून बीड शहरातील महिला, पुरुष समाज बांधवांनी या तीन दिवशीय कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन बीड तहसील माहेश्वरी सभेच्या वतीने करण्यात आले आहे.

आज जेष्ठ शुद्ध.९ शनिवार दि.१५ जुन महेश नवमी महोत्सव २०२४ निमित्ताने भगवान महेशजींच्या प्रतिमेच्या पूजनानंतर दुपारी ठिक ४.३० वा.वैष्णोदेवी मंदिर विप्र नगर,पेठ बीड येथून शुक्रवार पेठ, काळा हनुमान ठाणा, माऊली चौक, विठ्ठल मंदिर चौक, शनी मंदिर गल्ली, हनुमान मंदिर, महेश चौक, राजस्थानी विद्यालया मार्गे मॉ वैष्णो पॅलेस सभागृह पर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून सायंकाळी ७.०० वा. सतीशजी चरखा (समन्वयक-कार्यकारी प्रशिक्षण समिती, अखिल भारतीय माहेश्वरी महासभा तथा भूतपूर्व प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा), सि. ए. अनिरुद्धजी राठी आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महेश नवमी महोत्सवानिमित्त आज शनिवारी सकाळी नऊ ते अकरा यादरम्यान गुंतवणूक आणि विमा या विषयावर खुली संवाद चर्चासत्र संपन्न होणार असून या कार्यक्रमासाठी राजेंद्र झंवर, विजय जाजू यांचे मार्गदर्शन लाभणार असून याप्रसंगी प्रकल्प सभापती राहुल जाजू, अक्षय लड्डा, ब्रिजेशजी सोमाणी, सौरभ सिकची हे असून विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. रविवार दिनांक १६ जून २०२५ रोजी सकळी ९.३० ते ३.३० या दरम्यान उद्योग विकास कार्यशाळा या उपयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी श्री हितेशजी पोरवाल (संस्थापक बिझस्टार्ट, मुंबई) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून सुनीलजी चांडक (संस्थापक उद्योग वर्धिनी नाशिक), ब्रिजेशजी सोमाणी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. याप्रसंगी प्रकल्प सभापती पंकज धुत, नितीन मंत्री, शैलेश लड्डा हे असून या उद्योग, व्यवसायिक कार्यक्रमासाठी नाव नोंदणी विना शुल्क व अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच सायंकाळी सात ते साडेनऊ दरम्यान संगीतमय भजन संध्या या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांसाठी प्रकल्प सभापती अमित मंत्री, राजकुमार मालपाणी, हेमंत बियाणी, महेश लड्डा हे असून महेश नवमी महोत्सव २०२४ या तीन दिवसीय मॉ वैष्णो पॅलेस, एमआयडीसी रोड परिसर येथे संपन्न होत असलेल्या विविध कार्यक्रमासाठी युवती, महिला, युवक, पुरुष, ज्येष्ठ समाजबांधवांनी सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन बीड तहसील माहेश्वरी सभा, सकल माहेश्वरी समाज बीड यांच्या वतीने नम्र आवाहन करण्यात आले आहे.

आदिवासी विद्यार्थी, विद्यार्थीनीनी वसतीगृहाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा

बीड । प्रतिनिधी

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश योजना एकात्मिक आदिवाशी विकास प्रकल्प छत्रपती संभाजी नगर प्रकल्पातंगत येणा-या छत्रपती संभाजी नगर,जालना,बीड,लातूर या ४ जिल्हयातील १४ वसतिगृहामध्ये प्रवेशाकरिता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी, विद्यार्थीनींना तालुका स्तरावर इयत्ता ०८ वी पासून पुढील प्रवेशाकरिता व जिल्हा स्तरावर इयत्ता ११ वी पासून नंतरच्या शिक्षणाकरीता शासकीय वसतिगृह प्रवेश योजना पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनी करिता शासनामार्फत राबविण्यात येत आहे.

शैक्षणीक वर्ष २०२४-२५ या वर्षातील प्रवेश प्रक्रिया दिनांक १२ जून २०२४ पासून सुरु झालेली असून वसतीगृह क्षमता २७७५ च्या अनुषंगाने रिक्त असलेल्या १०७८ आणानुसार ऑनलाईन प्रणालीवर प्राप्त झालेल्या अर्जामधील पात्र विद्यार्थी विद्यार्थीनां प्रवेश देण्याची कार्यवाही वसतीगृह स्तरावर सुरु आहे. त्याअनुषंगाने सन २०२४-२०२५ करिता पालकाचे घोषणापत्र व विद्याथ्यांचे घोषणापत्र नमुना आणि विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज सादर करताना खालील लिंकमध्ये देण्यात आलेल्या सुचनांची खबरदारी घेण्यात यावी.तथापि वसतिगृह प्रवेशासाठी संकेत स्थळ सुरू करण्यात आलेले असून विद्यार्थ्यांनी संकेत स्थळावर अर्ज भरावा. तथा अर्ज भरल्यानंतर संबंधित गृहप्रमुख, गृहपाल यांच्याशी संपर्क साधावा.आदिवासी विद्यार्थी, विद्यार्थीनीनी वसतीगृहाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.संपर्क क्रमांक:- ०२४०-२४८६०६९.यावर संपर्क साधावा.

मुल आणि पालक यांच्यातील सुसंवाद गरजेचा-मिताली लाठी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुल आणि पालक यांच्यामध्ये केवळ संवाद गरजेचा नसुन सुसंवाद गरजेचा आहे. सोशल मीडियाच्या या काळात पालक आणि मुलांनी मोबाइलचा वापर आवश्यकतेपुरताच करावा. मोबाइल अडिक्शनचे परिणाम व्यसनाधीनतेपेक्षाही घातक असल्याने सोशल मीडियाच्या अधीन आजची मुले जावून त्यांचे शैक्षणिक नुकसान तर होत आहेच सोबत त्यांचा पालकांसोबतचा सुसंवाद खुंटत चालला आहे असे प्रतिपादन मिताली लाठी यांनी अंबाजोगाई येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने आयोजित मिले सुर मेरा तुम्हारा या कार्यक्रमात केले.

महेश नवमी निमित्त अंबाजोगाई तालुका माहेश्वरी समाजाच्या वतीने मिले सुर मेरा तुम्हारा हा कार्यक्रम येथील विलासराव देशमुख सभागृहात दि. १३ जुन रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना मिताली लाठी म्हणाल्या की, आजकाल सोशल मीडियाचा बोलबाला असल्याने प्रत्येक जण सोशल मीडियावर व्यस्त आहे. यामुळे मुल आणि पालक यांच्यातील संवाद खुंटत चालल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेकजण स्क्रीन अडिक्शनचे बळी पडत आहेत. यामुळे मुलांसोबत पालकांनी सुद्धा मोबाइलचा वापर कमी करुन आपल्या मुलांसोबत सुसंवाद साधावा. आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टी सोशल मीडियावर सार्वजनिक करु नयेत. आठवड्यातून एक दिवस मोबाइल पूर्णपणे वर्ज्य करावा. कुटुंबातील सुसंवाद हाच अनेक कौटुंबिक समस्यांवरील उपाय आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माहेश्वरी समाजाचे जिल्हा सचिव जगदीश जाजू यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दिपा धुत यांनी तर आभार प्रदर्शन नेतल थुत यांनी केले.

वासनवाडी परिसरातील विविध ठिकाणी लोखंडी विद्युत पोल लावा - शेख जहीर

बीड । प्रतिनिधी

शहरातील अहेमदनगर रस्त्यावरील वासनवाडी परिसरात असलेल्या गोरे वस्ती, खतिजा नगर, इदगाह नगर येथे लोखंडी पोल लावण्यात यावे आणि संभाव्य धोका टाळावा अशी मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाने महावितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

बीड शहरातील अहेमदनगर रोड वरील वासनवाडी परिसरात असलेल्या गोरे वस्ती, खतीजा नगर, इदगाह रोड या बीड शहर व नगर परिषद हद्दीला लागून असलेल्या वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणात लोकवस्ती निर्माण झाली आहे. मात्र येथे नागरी सुविधा अद्यापही हव्या त्या प्रमाणात पोहोचलेल्या नाहीत. लोक वस्ती वाढल्यामुळे महावितरण कंपनीकडून विद्युत लाईन ओढण्यात आलेली आहे परंतु ओढलेल्या विद्युत लाईनसाठी लोखंडी पोल लावण्यात आलेले नाही. या अवस्थेत राहणाऱ्या नागरिकांनी स्वखर्चाने लोखंडी पोल ऐवजी लाकडी खांब लावून त्यावर ओढलेल्या विद्युत वाहिनीवरून आपापल्या घरात विद्युत कनेक्शन घेतलेले आहे. सध्या पाऊस पाण्याचे दिवस आहे. तसेच वाराही मोठ्या प्रमाणात सुटतो. यामुळे या लाकडी खांबांना क्षती पोहोचू शकते. काही दिवसांपूर्वी येथे एक दुर्घटना घडली आहे. एका चिमुकलीला करंट लागून तिच्या जीवावर बेतले होते. दैवबलवत्तर म्हणून ती वाचली. यापुढेही अशी दुर्घटना घडू शकते. असे होऊ नये म्हणून या परिसरातील नागरिकांनी आतापर्यंत येथील सरपंच व ग्रामसेवकांना वेळोवेळी लोखंडी खांब लावण्याची गरज असल्याचे अनेकदा म्हटले आहे. परंतु या दोघांकडूनही अद्याप पर्यंत कोणतेही कार्य करण्यात आले नाही. म्हणून लवकरात लवकर येथे विद्युत खांब लावावे आणि या परिसरातील तिन्ही वसाहतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना संभाव्य धोक्यापासून वाचवावे. अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेसच्या निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाने महावितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. अन्यथा भारतीय राष्ट्रीय कांग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले, राष्ट्रीय कांग्रेसचे निराधार निराश्रित व्यक्ति विकास विभागाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राधिकाताई मखमले यांच्या सूचनेवरून आदरणीय राज्यसभा खासदार रजनीताई पाटील, राष्ट्रीय काँग्रेस बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही दिला आहे. यावेळी निराधार निराश्रित व्यक्ति विकास विभागचे बीड जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन, जिल्हा उपाध्यक्ष शेख आमेर पाशा, निराधार निराश्रित बीड तालुका उपाध्यक्ष तौफीक तांबोळी, बीड शहर संघटक जमील खान, सत्तार खान, सदस्य सय्यद मसलोद्दीन, शेख मुकद्दर, सुनील धायडे, शेख कलीम, शेख वहीद, शेख अंसार यांची प्रमुख उपस्थिती होती.

फळपिकावरील कीड व रोग नियंत्रणासाठी हार्टसॅप प्रकल्पाची अमलबजावणी

बीड । प्रतिनिधी

ऑकस्मिकरित्या उद्भवणाऱ्या फळपिकावरील कीड रोगांच्या प्रदुर्भावामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान व त्यामुळे उत्पादनात होणारे घट विचारात घेता कीड रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने कीड रोग सर्वेक्षण सल्ला व जनजागृती, कीड रोगांचे सर्वेक्षण सल्ला व व्यवस्थापन करणे, शेतकऱ्यांमध्ये कीड रोगांबाबत जागरुती निर्माण करणे याकरिता क्रॉपसॅप योजनेअंतर्गत फलोत्पादन पिकांचा समावेश करून कृषी विभागाची पीक संरक्षण व सर्वेक्षणाची एकच योजना राबविण्यात येत आहे.

हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत समाविष्ट फळपिकांवरील कीड रोगांच्या निरीक्षण नोंदणीसाठी व त्यावर आधारित पीक संरक्षण सल्ला देण्यासाठी राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन संशोधन केंद्र, नवी दिल्ली यांनी विकसित केलेल्या या ऑनलाइन संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. सन २०२४-२०२५ मध्ये हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यात डाळिंब व केज तालुक्यात आंबा या फळ पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. कीड रोग सर्वेक्षण, व्यवस्थापन व सनियंत्रण योजनेत तालुकानिहाय कीड सर्वेक्षणासाठी संबंधित तालुक्यातील कृषी सहाय्यक, कृषी प्रर्यवेशक व मंडळ कृषी अधिकारी यांची संख्या निर्धारित करण्यात आलेली असून यांनी ऑनलाइन संगणक प्रणालीद्वारे फळ पिकावरील कीड व रोगांची निरीक्षण, सर्वेक्षण नोंदणी करणे व त्यावर आधारित संरक्षण सल्ले देण्यात येणार आहेत. सर्वेक्षण कालावधी: डाळिंब १ जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ आंबा २ आक्टोबर २०२४ते ३० जून २०२५ प्रकल्पाचा उद्देश अंबा व डाळिंब या फळपिकांचे सर्वेक्षण करून कडीड रोगाचा प्रादुर्भावाबाबत शेतकऱ्यांना वेळीच उपाययोजना सुचविणे. फळ पिकावरील कीड रोगांच्या आकस्मिक प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळणे व उत्पादनात वाढ करणे, फळ पिकावरील कीडरोगांबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षित करून कीड रोगांचे वेळीच व्यवस्थापन करणे. वारंवार येणाऱ्या कीड रोगांबाबत माहिती संकलित करणे व कायमस्वरूपाच्या व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन संशोधन केंद्र नवी दिल्ली, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला जिल्हा सिंधुदुर्ग ही संस्था तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांच्या साह्याने शिफारशी निश्चित करणे व शेतकरी यांना शेतीशाळा वर्गात प्रशिक्षण देणे. राज्य पातळीवर कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली योजनेच्या संपूर्ण नियोजन व स नियंत्रणासाठी सुकाणू समितीचे रचना (स्टिअरिंग कमिटी) करण्यात आली असून यामध्ये विविध केंद्र व राज्य शासनाच्या कृषी संशोधन व विस्तार क्षेत्रातील संस्थाचा सहभाग आहे. सदर प्रकल्पांतर्गत बीड जिल्ह्यात डाळिंब व आंबा फळपिकाकरिता उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

राज्य लोकतंत्र

बनावटी औषधे विकणाऱ्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

औषध प्रशासनाची माजलगावात कारवाई; आयुर्वेदिक औषधे म्हणून ॲलोपॅथिक मिश्रण केलेल्या बनावटी औषधांची विक्री

माजलगाव । प्रतिनिधी

औषध प्रशासनाच्या छ.संभाजीनगर कार्यालयास मिळालेल्या गोपनीय माहितीवरून माजलगाव येथील छ.संभाजी महाराज चौक येथील नेटके आयुर्वेदिक औषधालय येथे आरोग्यासाठी घातक असलेले बनावटी औषधे तयार करून ती औषधे आयुर्वेदिक असे सांगून विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच दि.०७ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी २:२० च्या सुमारास औषध प्रशासनाचे छ.संभाजीनगर व बीड चे सहाय्यक आयुक्त आर.एम.बजाज व सहआयुक्त डी.सी.शेख यांच्या मार्गदर्शनाखाली, औषध निरीक्षक जी.द.जाधव व औषध निरीक्षक ब.दा.मरेवाड यांनी नेटके आयुर्वेदिक औषधालय,माजलगाव येथे दोन पंचासमक्ष धाड टाकली असता तेथे विक्री प्रतिनिधी श्रीमती निकिता श्रीराम भलभले या त्या ठिकाणी हजर होत्या.व दुकान मालक राहुल नेटके हे काही खाजगी कामानिमित्त बाहेरगावी गेले असल्याचे माहिती दिली. यावेळी दुकानाची झडती घेतली असता 'आयुर्वेदिक वात चूर्ण', 'आयुर्वेदिक मुळव्याध चूर्ण', आयुर्वेदिक अस्थमा चूर्ण' असे काही उत्पादने आढळली त्यावरील नमूद अन्न परवान्याची पडताळणी केली असता सदरील अन्न परवाना क्रमांक हा कुठेच नोंदणीकृत नसल्याचे समजले व या उत्पादनावर कुठल्याही उत्पादकाचे नाव व पत्ता नसल्याचे दिसल्याने सदरील औषधांचे नमुने तपासणी विश्लेषणासाठी संबंधित अधिकारी नमुना - १७ मध्ये आपल्यासोबत घेऊन गेले. सदरील औषधांची चाचणी केल्यानंतर त्याचा अहवाल दि.२३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रयोगशाळेकडून प्राप्त झाला व सदरील औषधींमध्ये आयुर्वेदिक औषधांसोबत ॲलोपॅथिक औषधांची भेसळ असल्याचे व सदरील औषधी या बनावट तसेच आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे औषधी प्रयोगशाळेकडून घोषित केल्याने दि.१३ जून २०२४ रोजी औषध निरीक्षक जी.द.जाधव, छ.संभाजीनगर अति.कार्यभार बीड यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात राहुल मदन नेटके व निकिता श्रीराम भलभले यांच्या विरोधात भा.दं.संहिता. १८६० च्या कलम ४२०,२७४,२७५,३४ तसेच औषधीद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम,१९४० च्या कलम ३३-(ब),३३-(१)()(),२८-ब नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक केतन राठोड हे करीत आहेत. सदरील संपूर्ण कारवाई औषध प्रशासनाचे छ.संभाजीनगर व बीड चे सहाय्यक आयुक्त आर.एम.बजाज व सहआयुक्त डी.सी.शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पंकजा मुंडे रविवारी आत्महत्याग्रस्त तरूणांच्या कुटुंबियांना भेटणार

बीड । प्रतिनिधी

पराभव जिव्हारी लागल्याने आत्महत्या केलेल्या तरूणांच्या कुटुंबियांची भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे रविवारी (ता. १६) भेट घेऊन त्यांचं सांत्वन करणार आहेत. जीव देऊन भागणार नाही बाळांनो..माझी शपथ आहे तुम्हाला स्वतःच्या जीवाचं बरं वाईट करून घेऊ नका असं आवाहन काल त्यांनी केलं होतं.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांचा निसटता पराभव झाल्याने कार्यकर्ते सैरभर झाले. अशातच हा पराभव जिव्हारी लागल्याने सचिन मुंडे (येस्तार ता. अहमदपूर), पांडुरंग सोनवणे (डिघोळ अंबा ता. अंबाजोगाई), पोपट वायबसे (चिंचेवाडी बीड) यांनी स्वतःचे जीवन संपवले. तरूणांच्या अचानक जाण्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. कार्यकर्त्यांच्या मृत्यूने पंकजाताई मुंडेंना अतिशय वेदना झाल्या, त्यांनी दूरध्वनीवरून त्यांचं सांत्वनही केलं होतं. यासंदर्भात त्यांनी व्हिडिओ शेअर करून तरूणांना संयम राखण्याचे देखील आवाहन केलेले आहे.

दरम्यान, पंकजाताई मुंडे आज संध्याकाळी परळीत येणार होत्या पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्या येऊ शकल्या नाहीत. पण रविवारी त्या कुटुंबियांना भेटण्यासाठी संबंधित गावात जाणार आहेत, त्यांचं सांत्वन करून धीर देणार आहेत. दरम्यान गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने आत्महत्या केलेल्या तरूणांच्या कुटुंबियांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

शांतता समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

बकरी ईदचा सन शांततेत पार पाडावा -जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

मुस्लिम धर्मियांचा सण बकरी ईद सोमवार दिनांक १७ जून रोजी आहे. हा सण शांततेत पार पडावा यासाठी प्रशासन सज्ज आहे आणि पोलीस दलानेही याची सर्व तयारी केली आहे. या सणासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ - मुंडे यांनी केले आहे.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, परिक्षाविधीन जिल्हाधिकारी अर्पिता ठुंबे,उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे,उपविभागीय अधिकारी कविता जाधव, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन दत्तात्रय इंगोले तसेच शांतता समिती सदस्यांची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या काही दिवसापासून सोशल मीडियावर टाकण्यात आलेल्या विविध संदेशामुळे काही प्रमाणात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर सर्वांनी सोशल मीडियावर असे संदेश न टाकण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले असे संदेश टाकणाऱ्यांवर पोलीस लक्ष ठेवून आहेत व सर्वांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.ज्या जनावरांची कुर्बानी देण्याची परवानगी आहे केवळ त्याच जनावरांची कुर्बानी देण्याची खबरदारी घेण्यात यावी तसेच तात्पुरत्या स्वरूपाचे काही ठिकाणी यासाठी उपलब्ध करून दिली जाणार आहेत त्याच अधिकृत ठिकाणांचा वापर कुर्बाणीसाठी करण्यात यावा,असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सर्व नगरपालिका क्षेत्रात या काळात स्वच्छता ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिले. बीड शहरातील स्वच्छता तसेच पाणीपुरवठ्याचा मुद्दा समिती सदस्यांनी बैठकीत मांडला. त्यांच्या सूचना लक्षात घेऊन नगरपालिका प्रशासनाने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

ओबीसीच्या मोर्चाने धारूर दणाणले

किल्लेधारूर । प्रतिनिधी

सकल ओबीसी च्या वतीने ओबीसी नेत्याची विरूध्द आक्षेनपार्ह पोस्ट सोशल मिडीयांचा करणारा वर कठोर कारवाई करावी हे तात्काळ थांबवावे नसता या विरूध्द कठोर भुमीका घेतली जाईल असा इशारा भव्य मोर्चा काढून देण्यात आला या मोर्च्यातील घोषणाणी शहर दणाणुण गेले होते तहसीलदारला मागण्याचे निवेदन देण्यात आले. तालुक्यातील सकल ओबीसी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते,

धारुर तालूक्यातील सकल ओबीसी समाजाचे वतीने धारूर तहसील कार्यालया वर भव्य मोर्चा काढण्यात आला सातत्यानै सोशल मिडीया वर भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे व इतर नेत्याची बदनामी करणारे पोस्ट फिरवल्या जात आहेत. नाहक ओबीसीला टारगेट केले जात आहे ओबीसी नेत्याची बदनामी कारक पोस्ट तात्काळ थांबून आशा पोस्ट टाकणारा वर कडक कारवाई करावी नसता ओबीसी समाज शांत बसणार नाही असा इशारा देत धारुर येथे सकल ओबीसी बांधवाचाभय मोर्चा काढण्यात आला.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकाच त्यांचे प्रतीमेला पुष्पहार घालून मोर्च्याची सुरूवात करण्यात आली छत्रपती शिवाजी महाराज चौकात त्याचे पुतळयाला अभिवादन करून मोर्चा मुख्यरस्त्याने घोषणा देत तहसील कार्यालया वर घेऊन जाण्यात आला.माजी नगराध्यक्ष उद्योजक माधवतात्या निर्मळ व भाजपाचे युवा नेते बाबरी मुंडे यांचे नेतृत्वा खाली हा मोर्चा काढण्यात आला तहसीलदारला मागण्याचे निवेदन देण्यात आले यावेळी माधवतात्या निर्मळ व बाबरी मुंडे यांनी मार्गदर्शन केले मोर्च्यातील घोषणाणी शहर दणाणुण गेले होतो तालूक्यातील सकल ओबीसी बांधव मोठ्या संख्येने या मोर्च्यात सहभागी झाला

नेत्याची नाहक बदनामी न थांबल्यास गंभीर भूमिका घेण्याचा इशारा, तहसीलदारांना निवेदन

वाहनाची नोंदणी प्राधिकरणाकडे करुन घ्यावी

बीड। प्रतिनिधी

जनावरांची वाहतुक करणाऱ्या वाहतुकदारांनी जनावरांची वाहतूक करण्यापूर्वी आपल्या वाहनामध्ये केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १२५ ई च्या तरतुदीनुसार वाहनांच्या बांधणीमध्ये सुयोग्य बदल करुन आपल्या वाहनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे करुन प्राप्त करुन घ्यावे.

२००१ च्यानियम ९६ च्या तरतुदीनुसार वाहनातुन जनावरांची वाहतूक करतांना वाहतुकदाराने सक्षम प्राधिकारण तथा यांनी तसेच केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी वा व्यक्ती वा प्राणी कल्याण संस्था यांनी जारी प्रमाणपत्र सोबत बाळगावे. नमूद प्रमाणपत्र जारी केले नसल्यास जनावरांच्या वाहतुक करण्यास वाहतुकदाराने नकार देणे अपेक्षीत आहे. तसेच , १९६०,१९७८ व २००१ या कायदा व नियमांच्या तरतुदीचे काटेकोरपणे पालन केल्याखेरीज जनवारांची वाहतुक करण्यात येऊ नये. या तरतुदींचे पालन न केल्यास संबधित कायदे नियमातील तरतुदीनुसार संबधिताविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी.

छत्रपती साखर कारखान्याचा रोलर पूजनाचा कार्यक्रम संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथील छत्रपती सहकारी सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२४-२५ च्या मिलच्या रोलर चे पूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कल दि.१४ जून २०२४ रोजी कारखान्याचे चेअरमन माजी आमदार बाजीरावभाऊ जगताप यांच्या हस्ते कारखान्याच्या मिलच्या रोलरचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप , राहुल जगताप सह संचालक मंडळ, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूक ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.राजेश इंगोले यांची इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक अध्यक्षपदी फेरनिवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडीकल असोसिएशन अंबाजोगाईचे सलग आठ वर्षे अध्यक्षपद भूषविलेले विक्रमादित्य डॉ.राजेश इंगोले यांनी मागील वर्षी आय.एम.ए. संघटनेतील सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भरीव व दमदार कार्याची नोंद घेत त्यांची पुन्हा एकदा राज्यकार्यकरणीच्या सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्या वर्षी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.इंगोले यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत व अभिनंदन होत आहे.

आय.एम.एचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे, सचिव डॉ.सौरव संजनवाला ,डॉ.जयेश लेले, नूतन अध्यक्ष डॉ.संतोष कदम, माजी अध्यक्ष डॉ.रामकृष्ण लोंढे,डॉ उज्वला दहिफळे, डॉ.संतोष कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ रमेश भराटे, डॉ तुकाराम मुंढे,डॉ.राजीव अग्रवाल यांच्यासह राज्य कार्यकारणीच्या सर्व सदस्यांनी एकमताने डॉ.राजेश इंगोले यांची सांस्कृतिक समितीच्या चेअरमनपदी निवड केली आहे. मागील दहा वर्षांपासून डॉ.राजेश इंगोले यांनी ज्या धडाडीने आणि तडफेने संघटनेचे काम केले आणि गेल्यावर्षी सांस्कृतिक समिती मार्फत डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केले त्याची दखल घेऊन राज्य कार्यकारणीच्या सर्व सदस्यांनी डॉ.राजेश इंगोले यांची समितीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड केली आहे. इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीच्या वतीने डॉ.इंगोले यांनी पुण्यामध्ये प्रथमच महाराष्ट्रातील साहित्यिक डॉक्टर्सचे पहिले शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करून डॉक्टर्सच्या साहित्यिक कलेला व्यासपीठ मिळवून दिले. या उपक्रमाची राष्ट्रीय कार्यकारणीने दखल घेत डॉ.राजेश इंगोले यांचा सन्मान केला होता. डॉ.इंगोले यांनी अंबाजोगाईच्या शाखेचे अध्यक्ष म्हणून काम करीत असताना संघटनेला तीन वेळा सर्वोत्कृष्ट शाखा, तीन वेळेस सर्वोत्कृष्ट अध्यक्ष असे विविध पुरस्कार मिळवून दिले. आय.एम.ए.संघटनेला विविध सामाजिक उपक्रम व कार्यात अग्रेसर ठेवत डॉ.इंगोले यांनी डॉक्टर्स

◀◀ पान ३ वर

द्रौपदाबाई खरटमोल यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील द्रौपदाबाई नरसिंगराव खरटमोल (वय ९३ वर्ष) यांचे वृध्दापकाळाने शुक्रवार दि.१४ जुन रोजी निधन झाले.

द्रौपदाबाई खरटमोल ह्या स्वभावाने मनमिळावू तसेच दुसर्याच्या सुख दुःखात सहभागी होणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या, धार्मिक- सामाजिक, सांस्कृतिक सोहळ्यात त्या अग्रेसर असत. आपल्या संस्कारातून मुलांना योग्य मार्गदर्शन करून उत्तम पद्धतीने मुलाची जडण-घडण व्हावी या उद्देशाने त्यांनी कार्य केले. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या पार्थिवावर शनिवार,दि.१५ जुन रोजी सकाळी नऊ वाजता दासोपंत समाधी परिसर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पाच मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील पत्रकार गोविंद खरटमोल यांच्या त्या मातोश्री आहेत.

धारूर शहरात गनिमी कावा : रात्रीतून बसवला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरात गेले दोन दशके छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा बसवण्याची मागणी शहरातील शिवप्रेमी नागरिक सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संघटना यांची मागणी होती या मागणीकडे प्रशासनाचे कायम दुर्लक्ष राहिल्यामुळे शहरातील शिवप्रेमी तरुणांनी न्याय मिळत नसल्यामुळे संतप्त होऊन दिनांक १४ जून २०२४ रोजी पहाटे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात अश्वरुड पुतळा बसवला.

छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरामध्ये अश्व रूढ पुतळा बसवण्यासाठीचा चबुतरा उभा होता मागणी असताना अश्वारूढ पुतळा उभारण्याबाबत प्रशासनाची उदासी नता दिसत असल्यामुळे संतप्त होऊन शिवभक्तांनी १४ जून रोजी पहाटे क्रेनच्या सहाय्याने अश्वरूड पुतळा बसवला विशेष म्हणजे ज्या तरुणांनी हा पुतळा बसवला त्यांनी पलाय न करता आम्ही कुठलेही चुकीचे काम केले नाही असे म्हणत छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या घोषणा दिल्या १४ जून सकाळी शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली पोलीस प्रशासनाचाही बंदोबस्त मोठ्या प्रमाणावर आहे. पुतळा बसवण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या आठ ते दहा तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

जागतिक योग दिनानिमित्त योग शिबिराचे आयोजन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

जागतिक योग दिनानिमित्त आर्ट ऑफ लिविंग यांच्या वतीने कला,विज्ञान,वाणिज्य महाविद्यालय अंमळनेर (भां) ता.पाटोदा जि.बीड येथे दि. १७/०६/२०२४ ते दि. २२/०६/२०२४ पर्यंत सकाळी ०६ ते ०९ या वेळेत सहा दिवसाचे योग शिबिर आनंद अनुभूती शिबिर आयोजित केले आहे.तरी पंचक्रोशीतील सर्वांनी या योग शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.सुरेश गर्जे, रविंद्र कदम,धर्मराज शिंदे,प्रा.बंडू शेरकर यांनी केले आहे.या शिबिरात आनंदी जीवन जगण्याची कला,योग,प्राणायाम,ध्यान व अतिशय सुंदर अशी सुदर्शन क्रिया शिकवली जाते.या शिबिरात १८ ते ५५ वर्ष वयोगटातील लोक सहभागी होऊ शकतात.

तरुणांना कारागिल युद्धाचा इतिहास समजावा - चंद्रशेखर बर्दापुरकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कारगिल युद्धाच्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्याने ५३० वृक्ष लावून शहिदांना मानवंदना देण्याचा संकल्प करण्यात आला असून त्याचा शुभारंभ स्वा.रा.ती. महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आला.

यावेळी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर, सहसचिव प्राचार्य भीमाशंकर शेटे,संचालक एल.जी. वैद्य,ॲड. कल्याणी विर्धे,प्रा. शैलजा बरुरे,पी.सी.गादेकर, मेजर एस.पी.कुलकर्णी, गणेश कदम,हेमंत धानोरकर, दत्ता बनसोडे आदी उपस्थित होते.कारगिल युद्ध हे भारतीय सेनेच्या परमोच्च धाडसाचे,प्रचंड राष्ट्रभक्ती व दुर्दम्य आत्मविश्वास या जोरावर सर्वात अवघड लढाई होती.

परमवीरचक्र प्राप्त युद्धातील कॅप्टन विक्रम बात्रा यांच्या स्मृती प्रित्यर्थ वृक्ष लागवड करून त्यांना अभिवादन करण्यात येत असल्याचे मेजर एस.पी.कुलकर्णी यांनी माहिती देताना सांगितले. तरुणांना कारगिल युद्धाचा इतिहास समजावा म्हणून त्यांच्या आठवणी वृक्षारोपणाच्या माध्यमातून जपण्याचा प्रयत्न ग्रीन आर्मीच्या वतीने करण्यात येत असल्याचे चंद्रशेखर बर्दापुरकर म्हणाले. हा ऐतिहासिक ठेवा वृक्षारोपणाने जपावा व या परिसराचे नंदनवन व्हावे व या परिसराला वैभव निर्माण होऊन ते विद्यार्थ्यांचे प्रेरणा केंद्र बनावे या उद्देशाने वृक्ष लागवड करून कारगिल सैनिकांना मानवंदना देण्यात येत असल्याचे भीमाशंकर शेटे म्हणाले मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

शेतकऱ्यांना बी-बियाणे आणि पत पुरवठा वेळेवर करा-अजित पवार

उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पुणे विभागीय मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक संपन्न

पुणे । प्रतिनिधी

यावर्षी राज्यातील पर्जन्यमान चांगले असण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असून शेतकऱ्यांना पेरणीबाबत मार्गदर्शन करण्यासोबत बी-बियाणे आणि पत पुरवठा वेळेवर होईल याकडे विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

विधान भवन पुणे येथे झालेल्या मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन तयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार दिलीप मोहिते पाटील, सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पुणे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, पिंपरी चिंचवडचे प्र.पोलीस आयुक्त सुनील रामानंद, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, हवामान विभागाचे शास्त्रज्ञ के.एस.होसाळीकर आदी उपस्थित होते.

श्री.पवार म्हणाले, खते आणि बियाण्यांबाबत शेतकऱ्यांना अडचण येणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. बँकांकडून शेतकऱ्यांना पतपुरवठा वेळेवर होईल याकडे लक्ष द्यावे. वेळेवर पतपुरवठा झाल्यास त्यांना कृषी निविष्ठा घेण्यासाठी त्याचा उपयोग होईल. बोगस खते आणि बियाणे विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

पाऊस चांगला असलेल्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना पेरणी करण्याविषयी मार्गदर्शन करावे. त्यांना पेरणीसाठी आवश्यक बियाणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यावे. ऊस पाचटबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी साखर कारखान्यांचे सहकार्य करण्यात यावे. शेतकऱ्यांना सौर पंप बसविण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे पुणे विभागात करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली. पुणे जिल्ह्यातील २ तर सातारा जिल्ह्यातील ४ दरड प्रवण गावातील नागरिकांना स्थलांतरित करण्यात येणार आहे. दरड प्रवण गावात आपत्ती मित्रांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, पशुसंवर्धन, आरोग्य, कृषी, राज्य परिवहन महामंडळ, रेल्वे, सहकार, दूरसंचार, विद्युत, पोलीस आदी विविध विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कृषी विभागातर्फे खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती देण्यात आली. बियाणे आणि खतांची पुरेशी उपलब्धता आहे. विभागात ८८ निविष्ठा विक्री परवाने निलंबित करण्यात आले आहेत आणि एका प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फळबाग लागवडीसाठी ८ हजार हेक्टरचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. श्री.होसाळीकर यांनी राज्यातील हवामानविषयी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. बैठकीस पुणे विभागातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अन्य वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मी पराभवाचे चिंतन करत नाही-अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

मी पराभवाचे चिंतन करत नाही. आरएसएसचे मुखपत्र ऑर्गनायझरबद्दल मला काहीही बोलायचे नाही. याबाबत मला काहीही माहिती नाही. सर्वांना आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. तसेच प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार आहे. राज्यसभेचा अर्ज दाखल करताना महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांना बोलावले नव्हते. त्यामुळे ते आले नाहीत. असे सांगून मंत्री छगन भुजबळ यांनीच आपण नाराज नसल्याचे सांगितले आहे, असे स्पष्ट करून भुजबळांच्या नाराजीच्या चर्चेचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी (दि.१४) खंडन केले.

पंढरपूर आषाढी सोहळा वारीच्या नियोजनाचा आढावा उपमुख्यमंत्री पवार यांनी आज सकाळी ११ वाजता पुण्यात घेतला. यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते ते पुढे म्हणाले की, पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी आळंदीतून ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आणि देहुतून तुकाराम महाराजांची पालखी निघणार आहे. याबाबतच्या नियोजनाचा आढावा बैठकीत घेण्यात आला. यावेळी वारकऱ्यांच्या सुचना स्वीकारल्या आहेत. त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. सुरक्षितता, स्वच्छता, रूग्णवाहिका, अग्निशमन दल, आरोग्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. पिंपरी-चिंचवड, पुणे महापालिकेच्या वतीने सोयीसुविधा पुरविल्या जाणार आहेत. याची त्यांनी तयारी केली आहे. पालखी मार्गावरील कामासाठी निधी देण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या स्तरावर आज वारीच्या नियोजनासाठी बैठक घेणार आहेत. यावेळी वारी संदर्भातील मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. संपूर्ण नियोजन झाले आहे

बहुविद्याशाखीय शिक्षण ही अनमोल संधी-डॉ. प्रमोद आंबेकर

पिंपरी । प्रतिनिधी

जागतिक पातळीवरील बदलत्या काळाची आव्हाने ओळखून शैक्षणिक क्षेत्रात मोठे बदल होत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून 'नवीन शैक्षणिक धोरण- २०२०' आले आहे. भारताला ज्ञान महासत्ता बनविणे, विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्ये व ज्ञानप्राप्ती आणि विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रामधील मनुष्यबळाची कमतरता दूर करणे, मानवी मूल्ये रुजविणे, चांगला नागरिक घडविणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणे ही नवीन शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे आहेत. या नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना बहुविद्याशाखीय शिक्षण घेता येणार आहे. एकाच वेळी आपल्या आवडीनुसार वेगवेगळ्या विद्याशाखेतील विषय घेता येतील हे स्वातंत्र्य त्यांना मिळणार आहे असे प्रतिपादन डॉ. प्रमोद आंबेकर यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महात्मा फुले महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० समिती, गणित व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्कूल कनेक्ट, एन.इ.पी. कनेक्ट अभियानांतर्गत आयोजित एक दिवसीय उद्बोधन कार्यशाळेत ते बोलत होते.

सुस्वागतम्
National Education Policy 2020
NATIONAL EDUCATION POLICY 2020
SCHOOL EDUCATION
HIGHER EDUCATION
Lt. Mr. Prasad Bathe
Shot on vivo Z1Pro
Vivo AI camera

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. माधव सरोदे होते. भारतीय ज्ञान प्रणालीचा अवलंब नवीन शैक्षणिक धोरणात केला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना वैश्विक नागरिक बनविण्यास मदत होणार आहे, तेव्हा नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी पातळीवरील शिक्षणाला विद्यार्थ्यांनी सक्षपणे सामोरे जावे असा मनोदय व्यक्त करून आपणास कार्यशाळेतून मिळालेल्या ज्ञानाचा समाजात प्रचार व प्रसार करावा असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'नवीन शैक्षणिक धोरण-२०२०' संदर्भात माहिती देणारा माहितीपट दाखविण्यात आला. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.नीलकंठ डहाळे, रयत शिक्षण संस्थेचे आजीव सभासद डॉ. दत्तात्रय हिंगणे, ज्युनिअर विभागाच्या पर्यवेक्षिका प्रा. रूपाली जाधव, बारावी उत्तीर्ण विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार लेफ्ट. प्रा. प्रसाद बाठे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिमा कदम यांनी केले.

१८व्या मिफ्फ मध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपटांचा अनुभव घेण्यासाठी पुणे सज्ज

पुणे । प्रतिनिधी

एनएफडीसी आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला लवकरच प्रारंभ होत असताना, पुणे शहरासाठी एक खास पर्वणी आहे.

देशभरातील सर्वोत्कृष्ट माहितीपट, लघुपट आणि निमेशन चित्रपटांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने पुणे, कोलकाता, दिल्ली आणि चेन्नई या शहरांमध्ये विशेष रेड कार्पेट प्रीमियर आणि चित्रपटांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

पुणेस्थित चित्रपट निर्मात्यांच्या चित्रपटांच्या प्रदर्शनाव्यतिरिक्त, महोत्सवात शहरातील एनएफडीसी - नॅशनल फिल्म आर्काइव्ह ऑफ इंडिया येथे बिली आणि मॉली - अन ऍन ऑटर लव्हस्टोरी या उदघाटन चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग देखील जाईल.

शहरात सर्वोत्कृष्ट चित्रपट आणण्याच्या उद्देशाने, १८ व्या मिफ्फ मध्ये १५ जून ते २१ जून या कालावधीत एनएफडीसी-एनएफएआय येथे अधिकृत निवड झालेले चित्रपट दररोज प्रदर्शित केले जाणार आहेत . पुण्यात प्रदर्शित होणाऱ्या श्रेणींमध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धा विभागात निवड झालेल्या काही अधिकृत चित्रपटांमध्ये सर्वनिक कौरचे अगेन्स्ट द टाईड, रॉजियर कॅपियरचे ग्लास माय अनफुलफिल्ड लाईफ , विघ्नेश कुमुलाईचे करपारा आणि होमर हर्मनचा आय एम नॉट यांचा समावेश असेल. याशिवाय अंकित पोगुला यांचा भेड चाल, शुभांगी राजन सावंत यांचा सहस्त्रसूर्य सावरकर आणि सुहास सीताराम कर्णेकर यांचा आठवणीतल्या पाऊलखुणा हे तीन मराठी चित्रपट पुण्यात प्रदर्शित होणार आहेत.

सर्वोत्कृष्ट चित्रपटांचा उत्सव साजरा करताना, १८ व्या मिफ्फ मध्ये पुण्यातील चित्रपट दिग्दर्शकांचे चित्रपट देखील पहायला मिळतील , ज्यांच्या चित्रपटांची महोत्सवात अधिकृत निवड झाली आहे . यापैकी काही चित्रपटांमध्ये साईनाथ एस. उसकईकर यांचा गुंतता हृदय हे (एंटँगल्ड) आणि कान चित्रपट महोत्सव विजेते चिदानंद नाईक यांचा सनफ्लॉवर्स वेअर द फर्स्ट वन टू नो यांचा समावेश आहे, हे दोन्ही लघुपटांच्या राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेतील. त्याचप्रमाणे अरिंदम किशोर दत्ता यांचा कनखुआ हा निमेशन श्रेणीतील राष्ट्रीय स्पर्धेत, प्रसाद रमेश भुजबळ यांचा भय हा राष्ट्रीय लघुकथा स्पर्धेच्या श्रेणीत आणि देवेश रंगनाथ कणसे यांचा म्हातारा डोंगर हा नॅशनल प्रिझम-स्टुडन्ट शॉर्ट फिल्म फिक्शन श्रेणीचा भाग म्हणून दाखवण्यात येणार आहे. १८ व्या मिफ्फ चे आयोजन १५ ते २१ जून २०२४ दरम्यान होणार आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या रस्त्यावर बांधली झोपडी

पुणे । प्रतिनिधी

राजगुरुनगर आपल्या घरासमोर शेजाऱ्याने शौचालय बांधल्याच्या रागातून एकाने मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील सिमेंट काँक्रिट रस्त्यावर झोपडी बांधून गावाला वेठीस धरण्याचा प्रकार घोटवडी (ता. खेड) येथे घडला. ग्रामस्थांनी याबाबत तहसीलदार प्रशांत बेडसे, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. मात्र आठवडा उलटून गेला तरी कारवाई होत नसल्याने ग्रामस्थ हतबल झाले आहेत.



खेड तालुक्यात पश्चिम भागात डोंगर दऱ्यात घोटवडी गाव आहे. परिसरात आढळवाडी ही ३०० नागरीकांची वस्ती आहे. आढळवाडीकडे जाण्यासाठी पाच वर्षांपुर्वी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील सिमेंट काँक्रिट रस्ता तयार करण्यात आला आहे. रस्त्याच्या कडेला काही नागरिकांची घरे आहेत. यातील एका व्यक्तीच्या वैयक्तिक वादातून हा प्रकार घडला असल्याचे सांगितले जात आहे.

या व्यक्तीच्या राहत्या घरासमोर दर्शनी भागात शेजारच्या व्यक्तीने शौचालय उभारले. त्याची तक्रार स्थानीक ग्रामपंचायतीकडे केली. मात्र त्यावर तोडगा निघाला नाही. या बहाद्दराने थेट काँक्रिट रस्त्यावर दगड गोटे आणि राडारोडा टाकून रस्ता अडवला. त्यानंतरही दखल घेत नाही हे पाहून चार लाकडी खांब रोवून त्यावर लाकडाचे छत व त्यावर ताडपत्री घालुन झोपडी बनवली आहे. या व्यक्तीच्या अजब वागण्यामुळे आढळवाडीच्या नागरिकांचे हाल झाले आहेत. दैनंदिन कामासाठी गावात येताना अडचण निर्माण झाली आहे. परिसरात पाऊस पडला आहे. शेतीची कामे सुरू झाली आहेत. परिसरात जाणे येणे किंवा शेतीची अवजारे, बैल, ट्रॅक्टर आदी ने-आण करण्यासाठी अवघड बनले आहे. शाळा, विद्यालय सुरू व्हायला काही दिवस बाकी आहेत. अशात रस्ता अडल्यामुळे नागरिकांनी अधिकाऱ्यांकडे विनवणी सुरू केली आहे.

देशात नावलौकिक असणारा 'सिंकदर' गेला

पुणे । प्रतिनिधी

घोड्यांवरून प्रवास करण्याची फार पूर्वीपासून असलेली परंपरा काळानुरूप नामशेष होत गेली. पण अद्यापही घोड्यांच्या शर्यती आणि मजा म्हणून घोड्यावरून सवारी केली जाते. पण याच घोड्यांना इतिहास काळात महत्त्वपूर्ण स्थान होते. आजही अनेक भागांमध्ये टांगा वापरला जातो. लग्नातही काही ठिकाणी घोडा किंवा घोडी वापरण्याची परंपरा कायम आहे. इंदापूर तालुक्यातील अकोले गावातील शेतकरी निलेश अष्टेकर यांनी जिवापाड सिंकदर या घोड्याचा सांभाळ केला होता. मात्र आज सकाळी सिंकदरचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे.

देशातीत उंच घोड्यांमध्ये सिंकदरचा नावलौकिक होता. तो ९ वर्षांचा होता. हा घोडा अष्टेकर फार्म येथे राहत होता. अनेक रेकॉर्डमध्ये त्याचे नाव नोंदवले होते. सोशल मीडियावर या घोड्याच्या निधनाची माहिती आल्यानंतर परिसरातील नागरिकांची हळहळ व्यक्त केली. अष्टेकर यांच्या मते हा एक सुपरस्टार आणि शानदार घोडा होता. त्याचा पंजाबमध्ये जन्म झाला होता. ही आमच्या कुटुंबासाठी अत्यंत दु:खद घटना असल्याचे घोड्याचा सांभाळ करणाऱ्या कुटुंबाकडून कळवण्यात आले. सकाळी दहा वाजता अंत्यविधी करण्यात आला.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी परदेशात शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज करण्याचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी २०२४-२०२५ मध्ये परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पी.एच.डी.) विशेष अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत करणे हा योजनेचा उद्देश आहे. या अभ्यासक्रमांसाठी क्टीव क्यूएस वर्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या राज्यातील ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

या योजनेअंतर्गत नजिकच्या काळात पालकांच्या कुटुंबाच्या उत्पन्न मर्यादेत तसेच जागांमध्ये वाढ झाल्यास त्यानुसार आवश्यक ते बदल आणि सुधारणा करून फेरअर्ज मागविण्यात येतील. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज पोस्टाने किंवा समक्ष समाज कल्याण आयुक्तालय, ३, चर्च रोड, पुणे-४११००१ येथे सादर करावेत, असे आवाहनही सहायक आयुक्त समाज कल्याण मल्लिनाथ हरसुरे यांनी केले आहे.

जनावरांच्या वाहतूकीसंदर्भातील नियमांचे पालन करण्याचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

जनावरांची वाहतूक करण्यापूर्वी वाहतूकदारांनी आपल्या वाहनांच्या बांधणीमध्ये सुयोग्य बदल करुन वाहनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे अर्ज करुन विशेष परवाना प्राप्त करुन घेणे बंधनकारक असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पिंपरी चिंचवड कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जनावरांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते त्याअनुषंगाने परिवहन विभागाकडून वाहतूकदारांना दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. जनावरांची वाहतूक करण्यापूर्वी वाहतूकदारांनी केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ नुसार वाहनाच्या बांधणीमध्ये सुयोग्य बदल करुन नोंदणी प्राधिकरणाकडे अर्ज करुन विशेष परवाना प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.

प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत (प्राण्यांची पायी वाहतूक) नियम २००१ च्या नियम ९६ मधील तरतुदीनुसार वाहनातून जनावरांची वाहतूक करताना वाहतूकदाराने सक्षम प्राधिकरण तथा भारतीय प्राणी कल्याण मंडळ व केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी वा व्यक्ती वा प्राणी कल्याण संस्था यांनी जारी केलेले प्रमाणपत्र सोबत बाळगावे. असे प्रमाणपत्र जारी केले नसल्यास जनावरांची वाहतूक करण्यास वाहतूकदाराने नकार देणे अपेक्षित आहे.

प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६०, प्राण्यांच्या वाहतूकीचे नियम १९७८ आणि प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत (प्राण्यांची पायी वाहतूक) नियम २००१ या कायदा व नियमांच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन केल्याखेरीज जनावरांची वाहतूक करण्यात येऊ नये. या तरतुदींचे पालन न केल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी कळवले आहे.